❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक




# महायुतीचे उमेदवार पहिल्याच पसंतीत निवडून येतील

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा विजयाचा दावा; सत्तारांच्या भूमिकेवरून एकनाथ शिंदेंना सल्ला

■ नागपूर (दै. संध्या)

सध्या महाराष्ट्रात पाच ठिकाणी पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांनी त्या त्या मतदारसंघात जाऊन आपल्या पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार सुरू केला आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर पदवीधर मतदारसंघातील भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या प्रचारासाठी गेले होते. यावेळी त्यांनी शिक्षकांची व प्राध्यापकांशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत या संदर्भात माहिती दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूर पदवीधर मतदारसंघामध्ये सुधाकर कोहळे हे आमचे उमेदवार आहेत. त्यांचा प्रचार करण्यासाठी आज विशेषतः शिक्षक प्राध्यापक आणि विद्यापाठ शिक्षक मंच जो आहे, त्या सगळ्यांसोबत संवादाचा कार्यक्रम होता. त्यांच्या अडचणी देखील मी ऐकून घेतल्या आणि त्यांना सांगितले की शैक्षणिक क्षेत्रात आमच्या सरकारने सातत्याने सरकारने काय कार्य केले आहे. या क्षेत्राला कसे महत्त्व दिले आहे आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर प्राध्यापक भरती देखील आमच्याच सरकारने सुरू केले आहे. या सगळ्या गोष्टी मी त्यांना सांगून त्यांना मत मागितली आहेत. आणि मला विश्वास आहे की इथे मोठ्या प्रमाणावर



आमच्या उमेदवारला मतदान होईल.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझे मत तर असे आहे की या निवडणुकीत दुसऱ्या पसंतीकडे आम्हाला जायची आवश्यकता पडणार नाही. पहिल्या पसंतीचा कोटा निश्चितपणे आमचे उमेदवार पूर्ण करतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

महाविकास आघाडीत आलबेल नसल्याचे बोलले जात आहे, यावर उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला असे वाटते की महाविकास आघाडी ही पहिले पासूनच अतिशय विभाजित आहे आणि विशेषतः गटा-तटाचे राजकारण हे खूप मोठ्या प्रमाणात आहे. आज आम्ही भाजप म्हणून महायुती म्हणून एकसंघपणे काम करत आहोत. विशेषतः नागपूरचा विचार केला, जर ज्या पद्धतीने भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय हे सगळे जे आमचे गट आहेत, मित्र पक्ष आहेत, हे काम करताना आपल्याला दिसत आहेत. तसे काही आपल्याला कॉंग्रेस किंवा त्यांची जी काही आघाडी आहे त्यात मात्र अशा प्रकारचे कुठेही दिसत नाही.

अमरावतीमध्ये महायुतीमध्ये देखील मतभेद दिसून येत आहेत. यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, अमरावतीमध्ये किरण सरनाईक हे महायुतीचे उमेदवार आहेत. भाजप त्यांच्या पाठीशी आहे. पुणे पदवीधर मतदारसंघात डॉ. स्मिता जाधव या महायुतीच्या उमेदवार आहेत, संपूर्ण महायुती त्यांच्या पाठीशी आहे, विशेषतः राष्ट्रवादी कॉंग्रेस. कारण काही भागांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्राबल्य चांगले आहे आणि स्वतः सुनेत्रा वहिनींनी बैठक घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांना कामी लावले आहे, शिवसेनेने देखील कामी लावले आहेत. केवळ पुणे जो शिक्षक मतदारसंघ आहे, त्यात मैत्रीपूर्ण लढत चाललेली आहे. त्यात आमच्या बेबनाव आमच्यात नाही. छत्रपती संभाजीनगरला आमचे जे सतीश चव्हाण आहेत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे, त्यांच्या पाठीशी शिवसेना आणि भाजप ही पूर्णपणे उभी आहे. त्यामुळे पाचही जागा आमच्या महायुतीच्याच निवडून येतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगरमध्ये सतीश चव्हाण यांच्यासाठी शिवसेनेचे दोन वेगळे गट झाले आहेत. अब्दुल सत्तर यांनी शरद पवार गटाच्या प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांना पाठिंबा दिला आहे. यावर प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला असे वाटते की मंत्री संजय शिरसाट यांनी कालच स्पष्टपणे सांगितले आहे की आम्ही महायुतीसोबत, सतीश चव्हाण यांच्यासोबत आहोत. भाजप तर पहिल्या दिवशीपासून त्यांच्या कामाला लागले आहे.

# कॅबिनेट बैठकीत मंत्र्यांचे खिसे झटकले तरी 1 लाख कोटी मिळतील- संजय राऊत

■ नवी मुंबई (दै. संध्या)

राज्याच्या तिजोरीत पैसा नाही, मात्र जे राज्य चालवत आहेत, त्यांच्याकडे तिजोरीच्या लुटीतून आलेली प्रचंड संपत्ती आहे. सर्वात जास्त पैसा भाजप आणि शिंदे गटाकडे आहे. हा पैसा कुठून आणि कसा आला, याचा मुख्यमंत्र्यांनी खुलासा केल्यास राज्याचे कर्ज आपोआप कमी होईल. एवढेच नव्हे, तर कॅबिनेट बैठकीत मंत्र्यांचे खिसे झटकले तरी 1 लाख कोटी रुपये जमा होऊ शकतात, असा घणाघाती आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. संजय राऊत म्हणाले की, राज्यात दुष्काळामुळे कोणी मरो किंवा जगलो, याशी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आणि मंत्र्यांना काहीही देणेघेणे राहिलेले नाही. मंत्री आणि मुख्यमंत्र्यांचा थाटमाट पाहिला, तर खरोखरच या राज्यावर 11 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे का, असा प्रश्न पडतो. केवळ गरिबांना रोजीरोटी मिळू द्यायची नाही, असे प्रकार सुरू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मंत्र्यांच्या नावावर संस्था उभारायची असेल, तर महाराष्ट्र उभारणीसाठी ज्यांनी कष्ट घेतले, त्यांचे ते सगळे प्रयत्न वाया गेले आहेत.

संजय राऊत म्हणाले की, सध्या राज्यात अत्यंत गंभीर परिस्थिती असून, आतापासूनच पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. ग्रामीण भागासह पुणे आणि मुंबईत पुढील 2 ते 4 महिन्यांत मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण होणार आहे. मुख्यमंत्री मोठमोठ्या घोषणा करून राज्य उत्तम चालल्याचा देखावा करत आहेत; परंतु त्यांना राज्यातील आर्थिक लूट अजूनही थांबवता आलेली नाही. विकास कामांच्या नावाखाली ठेकेदारांकडून कामे करून घेतली, मात्र सरकार त्यांना 95 हजार कोटी रुपयांची थकबाकी देऊ शकले नाही, ज्यामुळे ठेकेदार आत्महत्या करत आहेत. राज्यावर 11 लाख कोटींचे कर्ज असताना या भीषण दुष्काळाचा सामना कसा करणार? असा सवाल त्यांनी केला.

संजय राऊत म्हणाले की, राज्यात पडलेल्या दुष्काळाशी सामना करण्यासाठी किमान 50 हजार कोटी रुपयांची गरज आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या तोंडावर सध्या मुख्यमंत्र्यांनी केवळ 5 हजार रुपयांची मदत फेकली आहे. या राज्यकर्त्यांकडे निवडणुका लढवण्यासाठी लागणारा अतिरिक्त पैसा प्रचंड प्रमाणावर आहे. भाजप, शिंदे गट आणि सुनेत्रा पवार यांच्याकडे भरपूर पैसा आहे. सोमेश्वर सहकारी कारखान्याच्या निवडणुकीत विजयी झालेल्या पॅनलने तब्बल 30 कोटी रुपये खर्च केले असा दावा करत राऊत म्हणाले की, जर एका कारखान्याच्या निवडणुकीत 25 ते 30 कोटी खर्च होत असतील, तर पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत शिक्षकांना अर्धा-अर्धा तोळ्याचे सोन्याचे दागिने, सफारी सूट आणि पैठण्या वाटल्या जात आहेत. पदवीधर निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर पैशाचे वाटप सुरू आहे, मग राज्य गरीब आहे असे कसे म्हणता येईल? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## थोडक्यात...

### बीडमध्ये बस आणि कारचा भीषण अपघात

**बीड : दैनिक संध्या**

महाराष्ट्रातील बीडमध्ये तुळजापूरला जाणाऱ्या भाविकांना घेऊन जाणाऱ्या एका कारची राज्य परिवहन मंडळाच्या बसशी धडक झाली. या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. अपघातस्थळी पोलिस पोहोचले आहेत. स्थानिकांनी रस्ते बांधकामासाठी जबाबदार असलेल्या ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि मदत व बचावकार्य सुरू केले. सरकारी आकडेवारीनुसार, वर्ष २०२४ मध्ये भारतात रस्ते अपघातांमध्ये १.७७ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. याचा अर्थ असा की देशात दररोज सुमारे ४८७ आणि दर तासाला जवळपास २० जणांचा मृत्यू होत आहे. या मृत्यूंचे सर्वात मोठे कारण म्हणजे अतिवेगाने वाहन चालवणे आणि हेल्मेट किंवा सीटबेल्ट न लावणे होय.

### ग्वाल्हेर- ट्रकने 41 भाविकांना चिरडले

**ग्वाल्हेर : दैनिक संध्या**

मध्य प्रदेशाच्या ग्वाल्हेरमध्ये शनिवारी मध्यरात्री एका भरधाव ट्रकने ४१ भाविकांना चिरडले. त्यात १५ जणांचा मृत्यू झाला. तसेच दोन पोलीस कर्मचाऱ्यांसह इतर २६ जण जखमी झाले आहेत. ही घटना पहाटे दीडच्या सुमारास चिनोर रोडवरील एका उताराजवळ घडली. भाविक शितला माता मंदिरात जाण्यासाठी रस्त्याच्या कडेला रांगेत उभे होते. त्याच वेळी, चिनोरच्या दिशेने येणारा आणि भाताने भरलेला एक ट्रक उतारावर अनियंत्रित झाला. ट्रकचालक गुगल मॅप्सच्या मदतीने मार्ग शोधत होता. उतारावरून खाली येत असताना ट्रकचे ब्रेक निकामी झाले. ट्रकने पोलीस चेकपोस्ट तोडले, भाविकांना धडक दिली आणि शेवटी मंदिराच्या बाहेरील भिंतीवर व प्रवेशद्वारावर जाऊन आदळला. या धडकेमुळे मंदिराची भिंत कोसळली आणि अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकले. जखमींना जयारोग्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर, पीडितांच्या नातेवाईकांनी पोलिसांवर निष्काळजीपणाचा आरोप करत गोंधळ घातला. पोलिसांनी ट्रकचालक आणि ट्रकमालक दोघांनाही अटक केली आहे. ग्वाल्हेरचे सीएसपी रवी भदोरिया म्हणाले, "ट्रक चालक आणि मालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. चालकाने मद्यपान केले होते की नाही, हे निश्चित करण्यासाठी त्यांची वैद्यकीय तपासणी केली जाईल. प्राथमिक माहितीनुसार, ट्रक डबरा मंडीहून धान घेऊन जात होता. दोन ट्रक एकत्र प्रवास करत होते. हा मार्ग सहसा अवजड वाहनांसाठी वापरला जात नाही." एसडीएम नरेश बाबू म्हणाले, "वरिष्ठ डॉक्टर जखमींवर उपचार करत आहेत. सत्तावीस जण जखमी झाले असून, त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे."

# निवडणुका EVM वर घ्या किंवा कागदावर, जिंकणार आम्हीच; चंद्रकांत पाटलांचा दावा

■ नवी मुंबई (दै. संध्या)

राज्यातील विधानपरिषदेच्या 5 मतदारसंघांसाठी 23 ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून राजकीय नेत्यांच्या प्रचाराला वेग आला आहे. सर्वांचे लक्ष लागलेल्या पुणे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघात यंदा चुरशीची लढत पाहायला मिळत असून, महायुतीने शिक्षक मतदारसंघात एका 30 वर्षीय तरुणाला उमेदवारी दिली आहे, तर शिवसेनेने अपक्ष उमेदवार सचिन सानप यांना पाठिंबा दिला आहे. एका बाजूला विरोधकांकडून 'ईव्हीएम हटाव'चा नारा देत निवडणूक आयोगावर सातत्याने टीका केली जात असतानाच, दुसरीकडे भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मात्र या निवडणुकीत आपल्या विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

पुणे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी सोलापूर दौऱ्यावर आलेले मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली आहे. निवडणुका ईव्हीएम मशिनवर घ्या किंवा कागदावर घ्या, जिंकणार तर आम्हीच आहोत. सध्या विरोधकांची अवस्था 'नाचता येईना अंगण वाकडे' अशी झाली आहे, असे वक्तव्य त्यांनी केले. याचा दाखला देताना ते म्हणाले की, दिल्ली युनिव्हर्सिटीत कागदावर



झालेल्या निवडणुकीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने चारपैकी तीन जागा जिंकल्या आहेत, तसेच ओडिशातील सहाच्या सहा विद्यापीठांच्या निवडणुकाही त्यांनीच जिंकल्या आहेत. त्यामुळे आता 27 तारखेला होणाऱ्या या निवडणुकांमध्येही आपल्याला हेच दाखवून द्यायचे असून, निवडणुका कागदावर जरी घेतल्या तरी विजय आमचाच होईल, असा ठाम दावा पाटील यांनी केला आहे.

# ..तर महाराष्ट्र 15-20 वर्षे मागे गेला असता : शिंदे

■ नवी मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेतील बंड आणि त्यानंतर झालेल्या सत्तांतराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी अमरावती दौऱ्यात शिवसेनेतील बंडाबाबत भाष्य करताना, आपण धाडसाने निर्णय घेतला नसता तर महाराष्ट्र 15 ते 20 वर्षे मागे गेला असता, असे विधान केले. शिवसेनेतील बंड हा ऐतिहासिक निर्णय होता आणि त्यामुळेच महाविकास आघाडीचे सरकार कोसळले, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शिंदे यांनी शिक्षकांचे प्रश्न, जुनी पेन्शन योजना आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीबाबतही भूमिका स्पष्ट केली.

राज्यात विधान परिषदेच्या 5 मतदारसंघांमध्ये निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून, या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी प्रचाराला वेग दिला आहे. पुणे आणि अमरावती या दोन्ही ठिकाणी शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीकडे विशेष लक्ष लागले आहे. महायुतीकडून अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार किरण सरनाईक यांना पाठिंबा देण्यात आला आहे. त्यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अमरावतीत दाखल झाले होते.

या प्रचारसभेत बोलताना शिंदे यांनी आपल्या



राजकीय प्रवासातील महत्त्वाच्या निर्णयाचा उल्लेख केला. शिवसेनेतून बाहेर पडण्याचा आणि राज्यातील सत्तासमीकरण बदलण्याचा निर्णय घेताना धाडस दाखवावे लागले, असे त्यांनी सूचित केले. आपण हा निर्णय घेतला नसता, तर महाराष्ट्र 15 ते 20 वर्षे मागे गेला असता, असे म्हणत त्यांनी आपल्या भूमिकेचे समर्थन केले.

शिवसेनेतील बंडानंतर राज्यात मोठी राजकीय उलथापालथ झाली होती. महाविकास आघाडीचे सरकार कोसळले आणि राज्यात नवीन सत्तासमीकरण तयार झाले. याच घडामोडींचा संदर्भ देत शिंदे यांनी तो ऐतिहासिक निर्णय असल्याचे म्हटले. त्यांच्या या विधानामुळे शिवसेनेतील फुटीचा मुद्दा पुन्हा चर्चेत येण्याची शक्यता आहे. तसेच, महाविकास आघाडीच्या नेत्यांना लक्ष्य करत त्यांनी राजकीय विरोधकांवरही टीका केली.

अमरावतीच्या राजकीय परिस्थितीचा उल्लेख करताना एकनाथ शिंदे यांनी राणा दाम्पत्याच्या भूमिकेचाही संदर्भ दिला. वेळप्रसंगी राणा दाम्पत्य तुरुंगात गेले, पण ते घाबरले नाहीत, असे ते म्हणाले. आपणही त्याच पद्धतीने धाडसाने निर्णय घेणारे असल्याचे सांगत त्यांनी आपल्या राजकीय भूमिकेवर ठाम असल्याचे स्पष्ट केले.

शिंदे यांच्या या वक्तव्याचा रोख आपल्या निर्णयाचे समर्थन करण्याकडे होता. राजकारणात कठीण परिस्थिती असतानाही निर्णय घेण्याची तयारी आवश्यक असते, असा संदेश त्यांनी या विधानातून देण्याचा प्रयत्न केला. अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने झालेल्या या सभेत स्थानिक निवडणुकीसोबतच राज्याच्या राजकारणातील जुन्या घडामोडींचाही उल्लेख झाला. अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार प्रीती रेवने यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. याबद्दल एकनाथ शिंदे यांनी त्यांचे आभार मानले. महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी निवडणूक जिंकण्याचा निर्धार व्यक्त केला.

# टायगर श्रॉफच्या कारवर गोळीबार, तिघांनी 7 गोळ्या झाडल्या!

## जुहू पोलिस स्टेशनच्या अवघ्या 100 मीटर अंतरावरुन धडाधड गोळीबार

■ मुंबई (दै. संध्या)

राजधानी मुंबईतील जुहू परिसरात बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केल्याने एकच खळबळ उडाली आहे. या घटनेत टायगर श्रॉफ सुरक्षित असला, तरी तब्बल 10 राऊंड फायर केल्याचे समोर आलं आहे. या घटनेत लॉरेन्स बिश्नोई टोळीचा हात असावा, या शक्यतेची पोलीस चौकशी करत आहेत. जुहू येथील 'पुष्पा पार्क' भागात ही घटना घडली. फुटबॉल सामना खेळून टायगर श्रॉफ आपल्या चालकासोबत घरी परतत असताना हा प्रकार घडला. यावेळी त्याला पाहण्यासाठी तिथे लोकांची गर्दी जमली होती, त्याच वेळी अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्या गाडीवर गोळ्या झाडल्या. जखमींना नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. टायगरचा ड्रायव्हर आणि चाहता उमेश चव्हाण या घटनेत जखमी झाला आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना फोन करून टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेची माहिती घेतली. पोलिस आयुक्तांना त्यांनी तत्काळ वेगाने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणी धमकीच्या ऑडिओनंतर धमकीची फेसबुक पोस्ट शेअर करण्यात आली आहे. अनिल पंडित आणि हरमन संधू यांनी गोळीबाराची जबाबदारी स्वीकारत असल्याचा पोस्टमध्ये दावा



करण्यात आला आहे.

तब्बल 10 राऊंड फायर केल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी 15 टीम बनवल्या आहेत. DCP मोहित गर्ग यांनी सांगितले की, पोलिसांनी या घटनेमध्ये 15 टीम बनवली आहे. दरम्यान, लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या अँगलने सुद्धा पोलीस तपास करत आहेत. दरम्यान, कारवर दहा राऊंड गोळीबार झाल्यानंतर काही कारवर गोळ्या लागल्या तर काही खाली लागल्या. मुंबई पोलिसांच्या जुहू पोलीस स्टेशनच्या गेट समोरच घटना घडली. पोलिसांकडून महत्त्वाचे पुरावा गोळा करण्याचे काम सुरू आहे. संपूर्ण गोळीबाराची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे. या सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून पोलीस आरोपीच्या शोध घेत आहेत. दोन बाईकवरून आरोपी आल्याची माहिती समोर आली आहे. गोळीबार करून जुहू पोलीस स्टेशनच्या गेटवरून एस व्ही रोडला गेले. यानंतर विलेपार्लेकडून अंधेरीच्या दिशेने आरोपी फरार झाले आहेत.

खासदार वर्षा गायकवाड यांनी म्हटलं आहे की, आधी सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार, त्यानंतर बाबा सिद्दीकी यांची हत्या आणि आता अभिनेता टायगर श्रॉफवर गोळीबार झाल्याची बातमी! मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत एकापाठोपाठ एक अशा घटना घडत असतील, तर मुंबईकरांच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची? टायगर श्रॉफवरील गोळीबारात आणखी एका व्यक्तीला दुखापत झाल्याचे वृत्त आहे. गोळीबारामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही आणि पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला आहे की नाही? मुंबईकरांच्या सुरक्षिततेबाबत सरकार आणि गृह विभागाने उत्तर द्यावे! गोळीबारानंतर झिशान सिद्धीकी यांनी सांगितले की, आम्हाला दोन वर्षांत अजून न्याय मिळालेला नाही. माझ्या वडिलांच्या निधनाला दोन वर्षे झाली आहेत आणि मुंबईतील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती ज्या प्रकारे बिघडत आहे, ते खूप दुर्दैवी आहे. मला नुकतेच कळले की टायगर श्रॉफवर गोळीबार झाला, आणि ही एक अत्यंत चुकीची गोष्ट आहे. पूर्वी, जेव्हा माझा जन्मही झाला नव्हता, तेव्हा आम्ही मुंबई किती असुरक्षित होत आहे याबद्दल ऐकायचो. मी माझ्या सुरक्षेची मागणी करत आहे, पण माझी सुरक्षा एक टक्काही वाढलेली नाही. त्यामुळे, ही एक मोठी चिंतेची बाब आहे. मला वाटते की मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांनी या प्रकरणाकडे लक्ष दिले पाहिजे आणि आपण पोलीस अधिकारी व गुप्तचर यंत्रणेची निश्चितपणे चौकशी केली पाहिजे, कारण मुंबईत असे घडत आहे हे खूप दुर्दैवी आहे.

### मुंबईत नेमकं चाललंय तरी काय?

दरम्यान, या हल्ल्यानंतर काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे. त्यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळीबार झाल्याची बातमी अत्यंत धक्कादायक आहे. मुंबईत नेमकं चाललंय तरी काय? बाबा सिद्दीकी यांची हत्या, सलमान खानच्या घरावर गोळीबार, अनेक अभिनेते आणि निर्मात्यांना धमक्या, मुंबईत कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. कायदा-सुव्यवस्था नाही, तर जणू निर्व्यवस्थाच निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री पूर्णपणे अपयशी ठरले आहेत! 'महाराष्ट्राचा बिहार झाला' असं म्हणण्याची वेळ आली होती; पण आता तर बिहार बरा, असं म्हणण्याची वेळ आली आहे. मुंबईला गुन्हेगारांच्या दहशतीत ढकलणाऱ्या सरकारचा जाहीर निषेध!

सुप्रिया ताई सुळे म्हणाल्या की, "हे धक्कादायक आहे, सातत्याने महाराष्ट्रात क्राईम वाढतोय. म्हणजे हा आरोप नाहीये, हे वास्तव आहे. केंद्र सरकारचा डेटा जो सांगतो, हे डबल इंजिन सरकार आहे. म्हणजे एकाच विचाराचं सरकार महाराष्ट्रात आहे आणि एकाच त्याच विचाराचं केंद्रात आहे. त्या केंद्र सरकारचा डेटा सांगतो की महाराष्ट्रात क्राईम वाढलेला आहे. म्हणजे अतिशय चिंताजनक आहे. माझी महाराष्ट्राच्या सरकारला विनंती आहे की एकीकडे प्रचंड दुष्काळ महाराष्ट्रात आहे, आत्महत्या वाढतायत, बेरोजगारी खूप मोठी आव्हानं राज्याच्या आणि देशाच्या समोर आहेत. कुठेतरी लॉ अँड ऑर्डरचा प्रश्न हा वाढत चाललाय आणि लॉ अँड ऑर्डरचे प्रश्न कधी वाढतात? क्राईम कधी वाढतो? जेव्हा इकॉनॉमिक सिच्युएशन, आर्थिक इशूज जेव्हा वाढतात, तेव्हा या गोष्टी होतात. हे अतिशय चिंताजनक आहे आणि महाराष्ट्र सरकार या विषयाबद्दल गांभीर्याने नाही, हे महाराष्ट्राचं दुर्दैव आहे."

# संपादकीय

## वाढती पावले

भारतातील अभियांत्रिकी शिक्षणाच्या इतिहासात 'आयआयटी'ना विशेष स्थान आहे. देशाच्या तंत्रज्ञान क्षेत्राला दिशा देणारे असंख्य अभियंते, संशोधक, उद्योजक आणि जागतिक कंपन्यांचे नेतृत्व करणारे व्यावसायिक या संस्थांतून घडले; मात्र या प्रतिष्ठित संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व दीर्घकाळ तुलनेने कमी राहिले. प्रवेश परीक्षेत मुली उत्तीर्ण होत असूनही 'आयआयटी'च्या वर्गखोल्यांमध्ये त्यांचे प्रमाण अपेक्षेइतके दिसत नव्हते. यामागे अनेक सामाजिक आणि शैक्षणिक कारणे होती. विज्ञान आणि गणित हे मुलांसाठी अधिक योग्य विषय आहेत. अभियांत्रिकी हा पुरुषांचा व्यवसाय आहे. मुलींनी सुरक्षित किंवा पारंपरिक क्षेत्र निवडावे, अशा धारणा अनेक कुटुंबांमध्ये होत्या. ग्रामीण आणि निमशहरी भागातील मुलींना दर्जेदार मार्गदर्शन, कोचिंग, डिजिटल साधने आणि आर्थिक संसाधने मिळण्यातही अडचणी होत्या. यामुळे केवळ प्रवेशपरीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे समान संधी निर्माण होत नाहीत, हे लक्षात आले. या पार्श्वभूमीवर 'आयआयटी' आणि 'एनआयटी'मध्ये मुलींचे प्रतिनिधित्व वाढविण्यासाठी अतिरिक्त जागांची व्यवस्था करण्यात आली. २०१७-१८ पासून 'आयआयटी'मध्ये मुलींच्या प्रवेशासाठी अतिरिक्त सुपरन्यूमेरी जागा निर्माण करण्यात आल्या. त्यामागचा उद्देश स्पष्ट होता, मुलींची संख्या वाढवायची आणि अभियांत्रिकी शिक्षणातील लिंगविषमता कमी करायची. या धोरणाचा परिणाम आता दिसत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार २०२६ मध्ये 'आयआयटी'च्या 'बी. टेक.' अभ्यासक्रमांमध्ये मुलींचा वाटा २०.२२ टक्के झाला आहे. एकूण १८ हजार ८६१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी तीन हजार ८१४ मुली आहेत. 'एनआयटी'मध्ये मुलींचा वाटा सुमारे ३० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. ही आकडेवारी निश्चितच स्वागतार्ह आहे; पण या यशाचे मूल्यमापन करताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागेल, वीस टक्क्यांचा टप्पा गाठणे हे अंतिम उद्दिष्ट नसून सुरुवात आहे. 'आयआयटी' तिरुपतीमध्ये यंदा २१.२६ टक्के, 'आयआयटी' मद्रासमध्ये २१.१२ टक्के, 'आयआयटी' कानपूरमध्ये २०.३९ टक्के, 'आयआयटी' रुडकीमध्ये २०.६३ टक्के आणि 'आयआयटी' गुवाहाटीमध्ये २०.३५ टक्के मुलींनी प्रवेश घेतला आहे. 'आयआयटी' मुंबईत हे प्रमाण १९.७७ टक्के आहे, तर 'आयआयटी' खडगपूरमध्ये १९.३१ टक्के आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे मुली आता केवळ अभियांत्रिकी शिकण्याची इच्छा व्यक्त करीत नाहीत, तर देशातील सर्वांत कठीण प्रवेश परीक्षांमध्ये यश मिळवून 'आयआयटी'च्या दारात प्रवेश करीत आहेत. 'जेईई ॲडव्हान्स्ड' २०२६ मध्ये ४३ हजार ११२ मुलींनी नोंदणी केली. ४० हजार ५६२ मुलींनी परीक्षा दिली आणि त्यापैकी दहा हजार १०७ मुली पात्र ठरल्या. पात्र ठरणाऱ्या मुलींचे प्रमाणही मागील वर्षाच्या तुलनेत वाढले आहे. दिलेल्या आकडेवारीनुसार मुलींच्या यशाचा दर २१.७ टक्क्यांवरून २३.४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे ३७ मुलींनी 'जेंडर-न्यूट्रल पूल'मधून जागा मिळवल्या. याचा अर्थ या मुलींना मुलींसाठी उपलब्ध असलेल्या अतिरिक्त जागांचा लाभ न घेता सर्वसाधारण स्पर्धेतील जागांवर प्रवेश मिळाला. ही बाब प्रतीकात्मकदृष्ट्याही महत्त्वाची आहे. कारण मुलींच्या प्रवेशासाठी अतिरिक्त जागांची गरज आहे, याचा अर्थ मुली गुणवत्तेच्या स्पर्धेत मागे आहेत असा अर्थ अजिबात काढता येत नाही. उलट, समान संधी मिळाल्यास त्या कठीण स्पर्धेतही सक्षमपणे टिकू शकतात, हे या उदाहरणातून दिसते; मात्र इथेच धोरणकर्त्यांसमोर पुढचा प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे मुलींची संख्या वाढविण्यासाठी अतिरिक्त जागा पुरेशा आहेत का? उत्तर बहुधा नाही. कारण अभियांत्रिकी शिक्षणातील लैंगिक समानता ही केवळ प्रवेशाच्या आकडेवारीने मोजता येणार नाही. मुली 'आयआयटी'मध्ये आल्या; पण त्यांना कोणत्या शाखांमध्ये प्रवेश मिळतो? संगणकशास्त्र, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, एरोस्पेस, सिव्हिल, केमिकल अशा विविध शाखांमध्ये त्यांचे प्रमाण किती आहे? पदवी पूर्ण केल्यानंतर किती मुली उच्च शिक्षण, संशोधन आणि उद्योग क्षेत्रात जातात? किती जणी तंत्रज्ञान क्षेत्रात वरिष्ठ पदांवर पोहोचतात? किती जणी उद्योजक होतात? या प्रश्नांची उत्तरेही तितकीच महत्त्वाची आहेत. अनेकदा शिक्षणातील समानता आणि रोजगारातील समानता यांच्यात मोठी दरी दिसते. मुलगी अभियांत्रिकीची पदवी मिळवते; पण पुढे विवाह, कुटुंबाची जबाबदारी, स्थलांतर, कार्यस्थळावरील सुरक्षितता, मातृत्व आणि कामाच्या वेळा यांसारख्या कारणांमुळे तिच्या करिअरचा वेग कमी होऊ शकतो. त्यामुळे 'आयआयटी'मध्ये मुलींची संख्या २० टक्क्यांवर पोहोचली म्हणून समानतेचे उद्दिष्ट पूर्ण झाले असे मानणे घाईचे ठरेल. प्रवेशाच्या दारापासून नेतृत्वाच्या दारापर्यंतचा प्रवास अजून बाकी आहे. अभियांत्रिकी शिक्षणात मुलींचा सहभाग वाढविण्यासाठी शाळेच्या पातळीवरच वातावरण बदलावे लागेल. आठवी-नववीपासून मुलींना गणित, भौतिकशास्त्र आणि संगणकशास्त्र याबाबत आत्मविश्वास देण्याची गरज आहे. 'ही मुलांसाठीची क्षेत्रे आहेत' हा पूर्वग्रह दूर करणे आवश्यक आहे. शिक्षकांची भूमिका येथे महत्त्वाची ठरते. मुलींना विज्ञानाच्या प्रयोगांमध्ये पुढे येण्यासाठी प्रोत्साहन देणे, रोबोटिक्स, कोडिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या क्षेत्रांची ओळख करून देणे आणि महिला अभियंते व वैज्ञानिकांचे आदर्श त्यांच्यासमोर ठेवणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील मुलींसाठी हे अधिक महत्त्वाचे आहे. शहरातील चांगल्या शाळा, कोचिंग संस्था आणि डिजिटल साधने उपलब्ध असलेल्या मुलींना जे पर्याय सहज मिळतात, ते ग्रामीण भागातील प्रत्येक मुलीला मिळतातच असे नाही. त्यामुळे केवळ 'आयआयटी'मध्ये अतिरिक्त जागा निर्माण करून सामाजिक विषमता दूर होणार नाही. दर्जेदार शालेय शिक्षण, इंटरनेट, डिजिटल उपकरणे, वसतिगृहे, सुरक्षित वाहतूक आणि आर्थिक मदत या सर्व बाबींची जोड द्यावी लागेल. यासोबतच पालकांच्या मानसिकतेतही बदल आवश्यक आहे. आजही काही कुटुंबांमध्ये मुलाने अभियांत्रिकी करणे ही गुंतवणूक आणि मुलीने अभियांत्रिकी करणे हा पर्याय, असे अप्रत्यक्षपणे मानले जाते. मुलीला शिक्षण दिले, तरी नोकरी करणार का, लग्नानंतर काय होईल, दूरच्या शहरात राहता येईल का, अशा प्रश्नांनी तिच्या निवडी मर्यादित होतात; मात्र तंत्रज्ञानाचे क्षेत्र बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, सायबर सुरक्षा, रोबोटिक्स, बायोटेक्नॉलॉजी, हरित ऊर्जा आणि अवकाश तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत भारताला मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. या विकासात देशाच्या निम्म्या लोकसंख्येला मागे ठेवणे शक्य नाही. मुलींच्या वाढत्या सहभागाचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे तंत्रज्ञानाच्या स्वरूपावर होणारा प्रभाव. समाजातील विविध अनुभव तंत्रज्ञानाच्या निर्मितीत आले तर उत्पादने आणि सेवा अधिक समावेशक होण्याची शक्यता वाढते. आरोग्य, शिक्षण, सुरक्षितता, सार्वजनिक वाहतूक, डिजिटल सेवा किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. म्हणून 'आयआयटी'मधील मुलींची संख्या वाढविणे हे केवळ 'महिला सक्षमीकरण' या चौकटीत पाहणे अपुरे आहे. हा देशाच्या तंत्रज्ञान क्षमतेचा आणि मानवी भांडवलाचा प्रश्न आहे, तरीही अतिरिक्त जागांच्या धोरणाबाबत काही प्रश्न उपस्थित होतात. केवळ संख्यात्मक लक्ष्य पूर्ण करण्यासाठी प्रवेश वाढविणे पुरेसे आहे का? संस्थांमध्ये मुलींसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, वसतिगृह, आरोग्य सुविधा, सुरक्षा आणि मानसिक आरोग्य सेवा आहेत का? अभ्यासक्रम आणि कॅम्पस संस्कृती सर्व विद्यार्थ्यांसाठी समान संधी निर्माण करतात का? या प्रश्नांवरही सातत्याने लक्ष द्यावे लागेल. कारण समान प्रवेश म्हणजे समान अनुभव असे नसते. 'आयआयटी'सारख्या संस्थांनी आता पुढचा टप्पा गाठण्याची गरज आहे. मुलींची संख्या २० टक्क्यांवर पोहोचली आहे. पुढील उद्दिष्ट २५, ३० किंवा त्याहून अधिक असू शकते; पण त्याचबरोबर शाखानिहाय प्रतिनिधित्व, पदव्युत्तर शिक्षण, पीएच.डी., संशोधन, पेटंट, स्टार्टअप्स आणि प्राध्यापकपदांमध्येही महिलांचे प्रतिनिधित्व वाढविण्याचे लक्ष्य असायला हवे. 'एनआयटी'मध्ये मुलींचा वाटा ३० टक्क्यांपर्यंत पोहोचणे ही बाब या बदलाला आणखी व्यापक अर्थ देते. याचा अर्थ प्रीमियम तंत्रज्ञान संस्थांकडे मुलींचा विश्वास वाढत आहे. आता हा विश्वास संस्थांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षित वातावरण आणि समान संधी देऊन टिकवणे आवश्यक आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या बदलाचे श्रेय केवळ आरक्षण किंवा अतिरिक्त जागांना देता येणार नाही. मुलींच्या कुटुंबांनी घेतलेले निर्णय, विद्यार्थिनींची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, शाळा-कॉलेजमधील बदलते वातावरण आणि समाजातील बदलती मानसिकता यांचा त्यात मोठा वाटा आहे.

# बालगंधर्व येथे स्वर सिंधू नामफलकाचे अनावरण




■ चाकण (दै. संध्या)

बालगंधर्व रंगमंदिर येथे स्वर सिंधू नाम फलकाचे अनावरण डॉ. अमोल बेनके मेडिकल डायरेक्टर युनिकेअर हॉस्पिटल व डॉ. पल्लवी बेनके रेडिओलॉजिस्ट युनिकेअर हॉस्पिटल तसेच सिंधू मेडिकल फाउंडेशन व स्वर सिंधू म्युझिकल ग्रुपचे आयोजक चंद्रकांत हिवरकर यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात पार पडले.

संगीत हे असे औषध आहे की ज्याला गोळ्यांची गरज नसते. प्रिस्क्रिप्शनची गरज नसते आणि ज्याचा प्रत्येक स्वर मनाला नवी ऊर्जा देऊ शकतो, असे उद्गार डॉ. अमोल बेनके यांनी यावेळी व्यक्त केले. डॉ. पल्लवी बेनके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जिथे शब्द अपुरे पडतात तिथे संगीत बोलते. स्वर सिंधूंचा खरा उद्देश हाच आहे केवळ गाणी गाणे नव्हे तर संगीताच्या माध्यमातून माणसांना माणसांशी जोडणे असा आहे.

स्वर सिंधूच्या अनावरण प्रसंगी प्रथमतः दीप प्रज्वलन सतीश बारवकर, अतुल कालविंट, महेंद्र गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. चंद्रकांत हिवरकर यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कलाकारांनी आपआपली गीते सादर केली.

संजय फल्ले, नयन शिंदे, उत्तम जाधव, सुशील उपाध्ये, अरुण देवरे, अजय राऊत, गणेश शेटे, वनिता तुपे, रूपाली अभंग, प्रीती गायकवाड, हर्षा वैद्य आदींनी गीते सादर केली.दिवंगत वैष्णवी महेंद्र गोरे हिच्या स्मरणार्थ गायकांना सन्मानचिन्ह देण्यात आले. डॉ. कौस्तुभ तिडके, गौरी अतुल बेनके, विद्या मोहिते, महेंद्र गोरे, अरुण बनसोडे, भरत भुजबळ, दीपक कुंभार, सुधीर रामगीर, डॉ. आयेशा सिद्दिकी आदींच्या हस्ते गायकांना गौरविण्यात आले. वृषभ हिवरकर यांनी छायाचित्रण, शैलेश घावटे यांनी आवाज रसिकापर्यंत पोहचविला.

# चाकण बाजारात हिरव्या मिरचीची प्रचंड आवक

■ चाकण (दै. संध्या)



खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये गवार, दोडका, कांदा, बटाटा, शेवगा व हिरव्या मिरचीची प्रचंड आवक झाली. पालेभाज्या व फळभाज्यांचे भाव तेजीत राहिले आहेत. एकूण उलाढाल ६ कोटी ५० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ७५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत कांद्याची आवक स्थिर राहिल्याने कांद्याच्या भावात दोनशे रुपयांची वाढ झाली. कांद्याचा कमाल भाव ४,३०० रुपयांवरून ४,५०० रुपयांवर पोहोचला. बटाट्याची एकूण आवक १,९०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,५०० रुपयांवरून १,६०० रुपयांवर पोहोचला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १८ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३१० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयां पासून ते ६ हजार रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला. फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -टोमॅटो - ४३७ क्विंटल (७०० ते १,३०० रू.), कोबी - २४० क्विंटल (४०० ते ८०० रू.), फ्लॉवर - २६६ क्विंटल (७०० ते १,२०० रु.), वांगी - ५४ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), भेंडी - ८५ क्विंटल (२,५०० ते ४,००० रु.), दोडका - ७२ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), कारली - ७६ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ६१ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ८९ क्विंटल (१,००० ते ३,००० रु.), फरशी - ३६ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), वालवड - २८ क्विंटल (४,००० ते ६,५०० रुपये), ढोबळी मिरची - १५६ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), चवळी - ५० क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.), शेवगा - २० क्विंटल (५,००० ते ७,००० रु.), गाजर - २२५ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), गवार - ५६ क्विंटल (४,००० ते ६,००० रु. ), आले - १८५ क्विंटल (५,००० ते ९,००० रु. ), वाटाणा - ३० क्विंटल (८,००० ते १२,००० रु.), भुईमूग शेंगा - १२० क्विंटल (४,५०० ते ५,५०० रु.), रताळे - १०५ क्विंटल ( १,५०० ते २,५०० रुपये ),



# जानाई मंदिरात नवरात्रोत्सवाची भक्तिमय रागिनी!

■ पुरंदर(दै. संध्या)

महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र जेजुरीच्या पंचक्रोशीतील जयाद्री शक्तिपीठ असलेल्या जानाई देवी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सव पारंपरिक धार्मिक पद्धतीने उत्साहात सुरू आहे. नवरात्राच्या प्रत्येक माळेला देवीची विविध रूपे साकारली जात असून, सातव्या माळेला मातंग देवीचे आकर्षक रूप साकारण्यात आले. या मनमोहक रूपाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

जयाद्रीच्या ग्रामदेवतेचे स्थान असलेल्या जानाई देवी मंदिराला पंचक्रोशीत विशेष धार्मिक महत्त्व आहे. जेजुरीसह विविध जिल्ह्यांतून भाविक येथे दर्शनासाठी येतात. खंडोबा देवाच्या दर्शनाबरोबरच जानाई देवीचे दर्शन घेण्याची परंपरा अनेक भाविक जपतात. त्यामुळे हे मंदिर भाविकांच्या श्रद्धेचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

नवरात्रोत्सवाच्या प्रारंभापासूनच पुजारी ओंकार आगलावे व त्यांच्या बंधू परिवाराने अथक परिश्रमातून देवीची विविध रूपे साकारण्याची परंपरा जपली आहे. संपूर्ण नव्याने उभारण्यात आलेल्या जानाई देवी मंदिराच्या परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, तिच्या प्रकाशाने संपूर्ण परिसर उजळून निघाला आहे. देवीच्या नित्यपूजेसह विविध धार्मिक विधींमुळे मंदिरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

जानाई देवी हे परिसरातील जागृत देवस्थान मानले जाते. येथे वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पुरातन मंदिराचा अलीकडेच मोठ्या प्रमाणावर जीर्णोद्धार करण्यात आला असून, मंदिराच्या नूतनीकरणामुळे भाविकांना अधिक सुबक आणि प्रसन्न धार्मिक वातावरणाचा अनुभव घेता येत आहे. दररोज सकाळी ११.३० वाजता मंदिरात धार्मिक पूजा-पाठाचे आयोजन केले जाते. यावेळी जानाई देवी जीर्णोद्धार समितीचे कार्यकर्ते, खंडोबा पालखी सोहळ्यातील खांदेकरी-मानकरी तसेच समस्त ग्रामस्थ सहभागी होतात. आगलावे, खोमणे-पाटील, हरपळे, राऊत, माळवदकर, गोसावी, निरगुडे, गाडगे, देरकर, केंजळे, खुडे, जगताप, बयास, शिंदे, बारभाई, दीडभाई, हरिश्चंद्रे, मनेर, तांबोळी, पानसरे, स्वामी आदी विविध समाजघटकांतील भाविक आणि सेवेकरी देवीच्या दर्शनासाठी उपस्थित राहतात. विविध जाती-धर्मांच्या लोकांचा सहभाग हे या देवस्थानाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचे वैशिष्ट्य ठरते. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत देवीला विविध रूपांत सजविण्यात येते. भाविकांच्या सहभागातून धार्मिक कार्यक्रमांची परंपरा उत्साहाने पुढे नेली जात आहे.

# चित्रपट आणि नाट्य संस्थेतर्फे वर्दीतील नवदुर्गांचा सन्मान

■ पुणे (दै. संध्या)

चित्रपट आणि नाट्य संस्था, महाराष्ट्र राज्य व पोलीस सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून 'वर्दीतील नवदुर्गा सन्मान सोहळा' नुकताच पार पडला. सन्मान सोहळ्याचे यंदा ९ वे वर्ष होते. 'उत्सव स्त्रीशक्तीचा, सन्मान असामान्य कर्तृत्वाचा' या संकल्पनेतून पुणे शहरातील शिवाजीनगर, डेक्कन, कोथरूड, फरासखाना, लष्कर, स्वारगेट, खडकी, सांगवी, विश्रांतवाडी आणि सायबर पोलीस स्टेशन अशा नऊ पोलीस ठाण्यांना भेट देऊन कर्तव्यदक्ष महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र, तसेच मिठाई देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष शुभम मोरे, सचिव व अभिनेते चेतन गिरी, बालगंधर्व कलाकार असोसिएशनचे अध्यक्ष निलेंद्र यादव, उपाध्यक्ष व अभिनेते कुणाल देशमुख, संचालिका मोनिका टेंबरे, संचालिका व अभिनेत्री रश्मी बांदल, संचालिका व अभिनेत्री अनुश्री ढम, आनंदी फाउंडेशनचे गणेश विटकर, सामाजिक कार्यकर्ते रोहित भिसे, अभिनेते मयूर चव्हाण, प्रितेश गायकवाड, कुमार गायकवाड, केतन जाधव, अनिल गायकवाड, सुधीर भालेराव, ओमकार जाधव, अनिकेत जगताप, मयूर कांबळे, तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. समाजाच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या धैर्याला, समर्पणाला, कर्तव्यनिष्ठेला आणि कार्यक्षमतेला सलाम करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. वर्दीतील या नवदुर्गा आपल्या कर्तृत्वातून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

# शेतकऱ्यांच्या शेतीपंपांचा वीजपुरवठा बंद केल्याने शेतकरी संकटात

■ शिरूर (दै. संध्या)

तालुक्यातील घोडनदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतीपंपांचा वीजपुरवठा बंद केल्याने शेतकरी संकटात सापडले असून, द्राक्ष, डाळिंब, ऊस आणि चारा पिके धोक्यात आली आहेत. वीजजोडण्या तातडीने पूर्ववत करून पाणीप्रश्नावर तोडगा काढावा, या मागणीसाठी सोमवारी शिरूर तहसील कार्यालयासह जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्र्यांना निवेदन देण्यात येणार आहे. त्यानंतरही वीजपुरवठा सुरू न झाल्यास तहसील कार्यालयावर भव्य शेतकरी मोर्चा काढून पुढील टप्प्यात एमआयडीसीचा पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा घोडधरण शेतकरी कृती समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष दौलत नाना उमाजी शितोळे यांनी दिला.

घोड धरण व घोडनदीवरील पाण्याच्या नियोजनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या आदेशानुसार नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतीपंपांचा वीजपुरवठा बंद करण्यात आल्याने शिंदोडी, निमोणे, गुणाट, चिंचणी, मोटेवाडी यांसह परिसरातील शेतकऱ्यांसमोर गंभीर पेच निर्माण झाला आहे. शेतीसाठी पाण्याचा प्रमुख आधार असलेले वीजपंप बंद पडल्याने ऐन वाढीच्या काळातील पिकांना पाणी देणे अशक्य झाले असून, पिके जळण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. यासोबतच जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

या पार्श्वभूमीवर शिंदोडी येथील हनुमान मंदिरात बाधित शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत वीजपुरवठा बंद केल्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी, पिकांचे संभाव्य नुकसान आणि पाणीवाटपाच्या धोरणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे लढा देण्याच्या उद्देशाने घोडधरण शेतकरी कृती समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी दौलत नाना उमाजी शितोळे यांची उपस्थित शेतकऱ्यांनी सर्वानुमते निवड केली.

शासनाच्या पाणीवाटप धोरणात पिण्याच्या पाण्याला, त्यानंतर शेतीला आणि त्यानंतर औद्योगिक वापराला प्राधान्य मिळावे, अशी शेतकऱ्यांची भूमिका आहे. मात्र, शेतीसाठी पाणी उपसणारे वीजपंप बंद होत असताना उद्योगांना होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबत शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. पाणीटंचाईचे नियोजन करताना उभ्या पिकांचे संरक्षण, पशुधनासाठी चारा आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गरज यांचाही विचार होणे आवश्यक असल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. द्राक्ष, डाळिंब, ऊस तसेच जनावरांसाठी लागवड केलेल्या चारा पिकांना वेळेवर पाणी न मिळाल्यास उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.

आधीच खते, औषधे, मजुरी आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत वीजपुरवठा बंद राहिल्यास शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढणार असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली.

घोडनदीवरील शेतीपंपांचा बंद केलेला वीजपुरवठा तातडीने पूर्ववत करावा, उभ्या पिकांना पाणी देण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, पाणीवाटपाच्या निर्णयांची वस्तुनिष्ठ तपासणी करावी, तसेच उद्योगांना होणारा पाणीपुरवठा आणि शेतीसाठी पाणी बंद करण्याच्या निर्णयाचा आढावा घ्यावा, अशा प्रमुख मागण्या शेतकऱ्यांनी मांडल्या आहेत.

याशिवाय जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आणि बाधित गावांतील शेतकरी प्रतिनिधींसोबत प्रशासनाने तातडीची बैठक घेऊन ठोस तोडगा काढावा, अशी मागणीही करण्यात येणार आहे.शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात सोमवारी शिरूर तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांना निवेदन देण्यात येणार आहे. निवेदनानंतरही वीजपुरवठा पूर्ववत न झाल्यास तहसील कार्यालयावर भव्य शेतकरी मोर्चा काढण्यात येईल.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कौशल्य विकास अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी स्वावलंबी व्हावे : धुमाळ

**पुणे : दैनिक संध्या**

विविध प्रकारच्या कौशल्य विकास अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी स्वावलंबी व्हावे,असे मत यशस्वी संस्थेच्या संचालिका स्मिता धुमाळ यांनी व्यक्त केले.'यशस्वी' संस्थेच्यावतीने राबविण्यात आलेल्या कॉमी शेफ या कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या पहिल्या तुकडीच्या निरोप समारंभात त्या बोलत होत्या. याप्रसंगी सीएसआर भागीदार ज्वेलीन दवे यांनी विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले.याप्रसंगी प्राथमिक स्वरूपात अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या काही विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थ्यांच्या सामूहिक नृत्य गायनाने झाला.या कार्यक्रमासाठी ईशा फाटक इकबाल नीटोरी, तंजीम तकीलदार,मीनल मंथापुरवार, शुभांगी कांबळे आदींनी विशेष सहकार्य केले.

### ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरला 'इंडियाज बेस्ट वर्कप्लेसेस™ फॉर वुमेन 2026'मध्ये मान्यता

**पुणे : दैनिक संध्या**

मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर ला ग्रेट प्लेस टू वर्क इंडिया कडून इंडियाज बेस्ट वर्कप्लेसेस फॉर वुमेन 2026 या यादीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. ही मान्यता विश्वास, सर्वसमावेशकता, सातत्यपूर्ण शिक्षण आणि कर्मचारी-केंद्रित कार्यपद्धतींवर आधारित कार्यसंस्कृती उभारण्यावर मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर ने दिलेल्या भराचे प्रतीक आहे. मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर मधील महिला या संस्कृतीचा अविभाज्य भाग असून, त्यांच्या विविध दृष्टीकोनांमुळे, कौशल्यांमुळे आणि नेतृत्वगुणांमुळे प्रगतीला प्रेरणा मिळते तसेच आपल्या सामूहिक कार्यसंस्कृतीला आकार मिळतो. कार्यस्थळ संस्कृती क्षेत्रातील जागतिक स्तरावरील मान्यताप्राप्त संस्था म्हणून, ग्रेट प्लेस टू वर्क गेल्या तीन दशकांहून अधिक काळ विविध संस्थांमधील कर्मचारी अनुभव आणि कर्मचारी-केंद्रित कार्यपद्धतींचा अभ्यास करत आहे. दरवर्षी जगभरातील 150 हून अधिक देशांमधील 100 दशलक्षांपेक्षा अधिक कर्मचारी त्यांच्या कार्यस्थळ संस्कृतीला अधिक सक्षम करण्यासाठी मूल्यांकन, तुलनात्मक विश्लेषण (बेंचमार्किंग) आणि कृती आराखडा तयार करण्याच्या उद्देशाने ग्रेट प्लेस टू वर्कच्या प्रक्रियेत सहभागी होतात. यंदाच्या भारतातील मूल्यमापन प्रक्रियेत, कठोर आणि सखोल मूल्यांकन पद्धतीच्या आधारे इंडियाज बेस्ट वर्कप्लेसेस फॉर वुमेन 2026 मध्ये 200 संस्थांना मान्यता देण्यात आली आहे. या संस्थांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी विकसित केलेल्या प्रभावी कर्मचारी-केंद्रित कार्यपद्धतींबरोबरच, कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायावर सक्रियपणे काम करून उच्च विश्वासावर आधारित कार्यसंस्कृती निर्माण करण्यात विशेष प्राविण्य मिळवले आहे. इंडियाज बेस्ट वर्कप्लेसेस फॉर वुमेन 2026 या अहवालाची आणि संपूर्ण यादीची माहिती येथे उपलब्ध आहे. "महिलांना प्रगती करता येईल, त्यांची क्षमता पूर्णपणे विकसित करता येईल असे कार्यस्थळ निर्माण करणे ही एक सातत्यपूर्ण बांधिलकी आहे. त्यासाठी आम्हाला ऐकणे, शिकणे आणि काळानुरूप विकसित होत राहणे आवश्यक आहे. मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर मधील महिला त्यांच्या सखोल क्षेत्रीय ज्ञानामुळे, विविध दृष्टीकोनांमुळे आणि प्रभावी नेतृत्वामुळे आमच्या प्रत्येक उपक्रमाला बळकटी देतात आणि आमची संस्था दररोज अधिक सक्षम व लवचिक बनवतात. ही मान्यता आम्ही एकत्रितपणे उभारत असलेल्या कार्यसंस्कृतीची प्रभावी पावती आहे. तसेच, आमच्या कर्मचाऱ्यांना प्रगती करण्यासाठी, नेतृत्व करण्यासाठी आणि अर्थपूर्ण व परिणामकारक बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक संधी व पाठबळ उपलब्ध करून देणारे वातावरण निर्माण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला अधिक दृढ करते," असे अशीष के. श्रीवास्तव, मॅनेजिंग डायरेक्टर, मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर यांनी सांगितले. "भारताच्या कार्यबलामध्ये महिलांची भूमिका आजही अत्यंत महत्त्वाची आहे आणि त्या देशाच्या एकूण कार्यबलापैकी जवळपास एक चतुर्थांश हिस्सा आहेत. आमच्या संशोधनानुसार, स्वतंत्र योगदानकर्त्यांच्या (इंडिविजुअल कॉन्ट्रिब्यूटर) भूमिकांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व 28% आहे. मात्र, मध्यम व्यवस्थापकीय स्तरावर हे प्रमाण लक्षणीयरीत्या घटून केवळ 17% राहते. यामुळे करिअरमधील सातत्य, प्रायोजकत्व (स्पॉन्सरशिप) आणि पाठबळ देणाऱ्या प्रणाली अधिक मजबूत करण्याची गरज अधोरेखित होते. आजच्या नेतृत्वासमोर महिलांच्या करिअरला दीर्घकालीन स्थैर्य प्रदान करण्याची आणि त्यांना करिअर तसेच आयुष्यातील महत्त्वाच्या संक्रमणाच्या टप्प्यांमध्ये सक्षम बनवण्याची मोठी संधी आहे.

### निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात आपचे निगडीत घंटानाद आंदोलन

**पुणे : दैनिक संध्या**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कथित पक्षपाती व मनमानी कारभाराचा निषेध करण्यासाठी तसेच निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणाच्या मागणीसाठी आम आदमी पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर शाखेच्या वतीने आज निगडी तहसील कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी 'घंटा वाजवा, देश जागवा!', 'एसआयआर रद्द करा' आणि 'मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार राजीनामा द्या!' अशा घोषणा देत निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात निषेध नोंदविला. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, स्वतंत्र आणि विश्वासार्ह असावी, अशी मागणी आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी यावेळी केली. प्रत्येक नागरिकाच्या मतदानाच्या मूलभूत लोकशाही अधिकारांचे संरक्षण झाले पाहिजे. निवडणूक प्रक्रियेबाबत नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण होण्यासाठी पारदर्शकता राखणे आवश्यक असल्याची भूमिका आंदोलकांनी मांडली. लोकशाही मूल्यांचे रक्षण आणि नागरिकांच्या हक्कांसाठी आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने यापुढेही संघर्ष सुरू ठेवण्यात येईल, असे वैजनाथ शिरसाट यांनी सांगितले. या आंदोलनावेळी आपचे नेते सुरेश गायकवाड, उपाध्यक्ष चंद्रमणी जावळे, युवक अध्यक्ष विकी पासोटे, पिंपरी विधानसभा अध्यक्ष ॲड. सुप्रिया गायकवाड, सुरेश बावनकर, आप नेत्या कविता कोंडे देशमुख, सुनंदा दुधाळ, यशवंत कांबळे, लक्ष्मण माने, राहुल मदने, मोहम्मद मोसीन, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुणे लोकमान्य फेस्टिवलमध्ये रंगली तांडव नृत्याची भव्य प्रस्तुती

■ पुणे : (दै. संध्या)

पुणे लोकमान्य फेस्टिवलमध्ये महाकाली तांडव डान्स लाईव्ह शो हे प्रमुख आकर्षण ठरले. निर्माता अजिंक्य साळुंखे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या नृत्याविष्कारात प्रमुख आकर्षण म्हणून सोनाली पुणेकर यांनी दमदार प्रस्तुती केली. महाकालीच्या उग्र आणि शक्तिशाली रूपाचे दर्शन घडविणाऱ्या या नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या विशेष नृत्यप्रस्तुतीमध्ये कलाकारांनी महाकालीची प्रभावी वेशभूषा धारण केली होती. कलाकारांचा चेहरा, हात आणि पाय लाल रंगाने रंगविण्यात आले होते. डोक्यावर कवट्यांची नक्षी असलेला चमकदार चांदीचा मुकुट, गळ्यात मानवी कवट्या आणि हिरव्या पानांनी गुंफलेली लांब मुंडमाळ, अशी त्यांची वेशभूषा होती. काळ्या रंगाचा फुल-स्लीव्ह टॉप आणि पँट, कंबरेला चित्त्याच्या छापील नमुन्याचे वस्त्र तसेच हातात चांदीच्या आणि पांढऱ्या रंगाचा भव्य त्रिशूळ यामुळे महाकालीचे रौद्र रूप अधिक प्रभावीपणे साकारण्यात आले.

मराठी आणि हिंदी गीतांच्या तालावर कलाकारांनी सादर केलेल्या नृत्यातून शक्ती, भक्ती आणि ऊर्जेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. आकर्षक वेशभूषा, प्रभावी देहबोली आणि जोशपूर्ण नृत्याविष्कारामुळे या कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

महाकालीच्या रूपातील कलाकारांची उपस्थिती आणि तांडव नृत्याची भव्यता हे या शोचे वैशिष्ट्य ठरले. या कार्यक्रमाची माहिती पुणे लोकमान्य फेस्टिवलचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते यांनी दिली.




## चित्रकला स्पर्धेत आराध्य लांडे, सई लांडगे प्रथम

■ पुणे (दै. संध्या)

श्री महालक्ष्मी मंदिराच्या वतीने नवरात्र उत्सव २०२६ निमित्त आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत पाचवी ते सातवी गटात आराध्य लांडे, तर आठवी ते दहावी गटात सई लांडगे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विशेष विभागात सार्थक सिंग याने प्रथम, तर अंश परचे याने द्वितीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना एक लाख सहा हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली, तर दोन विद्यार्थ्यांचा विशेष पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.

सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिरात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस अधिकारी मिलिंद मोहिते, स्वप्ना गोरे, मंदिराचे विश्वस्त भरत अग्रवाल, उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी आणि प्रवीण चोरबेले उपस्थित होते. मंदिराचे संस्थापक, प्रमुख विश्वस्त राजकुमार अग्रवाल व प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

'प्राणी बोलू शकले तर', 'भिंती



नसलेले ग्रंथालय' आणि 'जगाशी कनेक्टेड, आयुष्यापासून डिस्कनेक्टेड' हे तीन विषय विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. अनंत डेरे आणि निताली हरगुडे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. इयत्ता पाचवी ते सातवी गटात अभिनव विद्यालयाच्या आराध्य लांडे याने प्रथम क्रमांक मिळवला. जी. आर. पालकर प्राथमिक शाळेच्या कार्तिक पाटील याने द्वितीय, तर विस्डम वर्ल्ड स्कूल, वाकडच्या रिद्धी साहू हिने तृतीय क्रमांक पटकावला.

इयत्ता आठवी ते दहावी गटात ज्ञानेश विद्यालयाच्या सई लांडगे हिने प्रथम क्रमांक मिळवला. सेंट मिराज विद्यालयाच्या सानुजा पाटील हिने द्वितीय, तर ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या समृद्धी बारटक्के हिने तृतीय क्रमांक पटकावला. विशेष विभागात सार्थक सिंग याने प्रथम, तर अंश परचे याने द्वितीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेत विश्वकर्मा विद्यालय, बिबवेवाडी; युनिव्हर्सल विस्डम स्कूल, बालेवाडी; विस्डम वर्ल्ड स्कूल, वाकड व हडपसर; महेश विद्यालय, कर्वे रोड आणि मॉडेल स्कूल, शिवाजीनगर या ठिकाणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाचा निर्धार : आमदार प्रसाद लाड

■ पुणे (दै. संध्या)



आगामी पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीचे नियोजन, रणनीती आणि मतदार नोंदणीचा आढावा घेण्यासाठी आज पिंपरी विधानसभेमध्ये भारतीय जनता युवा मोर्चा सर्व पदाधिकाऱ्यांची युवा मोर्चाच्या वतीने अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. ही बैठक पिंपरी विधानसभा प्रभारी तथा आमदार श्री. प्रसादजी लाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी आमदार श्री. अमित गोरखे यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ. सौ. स्मिताताई जाधव (पुणे पदवीधर मतदारसंघ) आणि श्री. कौस्तुभ गावडे (पुणे शिक्षक मतदारसंघ) यांच्या विजयाचा निर्धार व्यक्त केला.

या बैठकीस पिंपरी विधानसभा प्रभारी आमदार श्री. प्रसादजी लाड, सहप्रभारी आमदार सौ. स्नेहाताई दुबे, आमदार श्री. अमित गोरखे, आमदार सौ. उमाताई खापरे, भाजपा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्नजी (बापू) काटे, आणि पिंपरी-चिंचवड शिक्षक मतदारसंघ निवडणूक संयोजक श्री. सदाशिवजी खाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी, पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी बूथ स्तरावर गांभीर्याने काम करण्याचे आवाहन केले. तसेच प्रत्येक पदवीधर आणि शिक्षक मतदारांपर्यंत पोहोचून राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती पोहोचवण्यावर भर दिला जावा, असे निर्देशही त्यांनी दिले. मतदार नोंदणी वाढवणे, संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे आणि प्रचाराची प्रभावी आखणी करणे या मुद्द्यांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

## स्त्रीच्या अभिव्यक्तीला बळ देण्यासाठी विविध पिढ्यांतील लेखिकांचा संवाद आवश्यक : आ. डॉ. नीलम गोऱ्हे

■ पुणे (दै. संध्या)



स्त्रियांचे अधिकार, विकास आणि सक्षमीकरण यांविषयी स्त्रिया व पुरुषांनी केलेली साहित्यनिर्मिती हा स्त्रीवादी साहित्याचा व्यापक आशय आहे. बदलत्या सामाजिक आणि डिजिटल वास्तवात विविध पिढ्यांतील लेखिकांनी एकत्र येऊन अनुभवांची देवाणघेवाण करणे आवश्यक आहे. स्त्रीवादी साहित्य संमेलनातून ज्येष्ठ आणि नवोदित लेखिकांमध्ये संवाद घडवून स्त्रीच्या अभिव्यक्तीला बळ देण्याचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन शिवसेना नेत्या, विधान परिषद सदस्या तथा माजी उपसभापती आ.डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, समर्थ युवा फाउंडेशन, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि स्त्री आधार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी स्त्रीवादी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालय परिसरातील के. बी. जोशी सभागृह, कर्वेनगर, पुणे येथे सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत हे संमेलन होणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद येथे आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत डॉ. गोऱ्हे आणि योगेश सोमण यांनी संमेलनाची माहिती दिली. यावेळी स्वाती महाळंक, प्रदीप निफाडकर उपस्थित होते. शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीनिमित्त आयोजित करण्यात येत असलेल्या ९९ नांदी संमेलनांच्या उपक्रमांतर्गत हे संमेलन होत आहे. ज्येष्ठ लेखिका डॉ. छाया महाजन संमेलनाध्यक्ष आहेत. उद्घाटन सत्राआधी उपमुख्यमंत्री मा.ना.श्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.श्री चंद्रकांत पाटील आणि उद्योग व मराठी भाषा मंत्री मा.ना.श्री उदय सामंत यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

## नवदुर्गांनी दिला शारीरिक, मानसिक आरोग्याचा मंत्र

■ पुणे (दै. संध्या)



कोरोनानंतर आपल्या समाजात आरोग्य विषयीची काळजी आणि त्याबाबत काही घेण्याची खबरदारी याबाबत चांगली जागृती झाली आहे. समाजातील प्रत्येक जण आपले आरोग्य चांगले राखण्यासाठी प्रयत्न करताना दिसतो. आरोग्य म्हणजे फक्त शारीरिक आरोग्य नव्हे तर मानसिक भावनिक आणि सामाजिक आरोग्याचाही त्यात अंतर्भाव होतो असे सर्व समावेशक आरोग्य चांगले राखणे म्हणजे निरोगी आरोग्य आहे. असा निरोगी आरोग्याचा मंत्र नवदुर्गांनी आज विद्यार्थ्यांना दिला.

शारदीय नवरात्रोत्सवात आदिशक्तीचा जागर केला जातो. हे औचित्य साधून संयुक्त स्त्री संस्थेच्या वतीने समाजातील आदीशक्ती असलेल्या नवदुर्गा पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या निमित्ताने नविन पिढीला समाजातातून कर्तृत्ववान महिलांची आणि आपल्या परंपरांची ओळख करून देण्यासाठी हा कार्यक्रम गेली १४ वर्षे शाळेत करण्यात येत आहे.

यंदा समाजातील डॉ.अश्विनी जोशी, डॉ. लीना भोंडे, मानसी भागवत ( समुपदेशक ), डॉ तेजस्विनी भाले (आयुर्वेदिक चिकित्सक )डॉ वैजयंती काळे, मधुवंती वैद्य (रेकी), डॉ माणिक आगाशे ( फिजीओथेरपीस्ट), नमिता जोशी ( हस्ताक्षर तज्ञ समुपदेशक ), वेदाली इनामदार ( स्पीच थेरपी ), अश्विनी नवाथे ( म्युझिक थेरपी ) या नवदुर्गांचा शारदीय नवरात्राचे औचित्य साधून सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी हळक कुंकू, अत्तर लावले, प्रसाद दिला. हातावर स्वस्तिक काढले. त्यानंतर त्यांना तांब्याचा कलश, त्यावर आंब्याच्या पानांवर श्रीफळ व त्यावर गरजा ठेवलेला मंगल कलश देऊन त्यांचे पूजन केले. अध्यक्षा नीता रजपूत, सचिव मधुरा जोगळेकर, साधना अबिके आणि त्यांच्या सहकारी यावेळी उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थ्यांनी नव दुर्गाना प्रश्न विचारून बोलते केले.

व्यक्ती तितक्या प्रकृती अशी आपल्याकडे म्हण आहे ती खरी आहे कारण प्रत्येकाची प्रकृती वेगवेगळी आहे त्यामुळेच एकासारखा आजार दुसऱ्याला झाला तरी त्यावर करायची उपचार पद्धती बदल करावे लागतात. त्यामुळे केवळ औषधोपचार सोडून आयुर्वेदिक उपचार, होमिओपॅथिक उपचार, म्युझिक थेरपी फिजीओथेरपी मानसोपचार अशा वेगवेगळ्या उपचार पद्धती विकसित झालेल्या आहेत. आत्ताची ही विद्यार्थ्यांची पिढी खरंच भाग्यवान आहे कारण त्यांच्यासाठी बहुआयामी उपचार पद्धती उपलब्ध आहेत असे नवदुर्गांनी सांगितले. समाजात विविध क्षेत्रात काम करणा-या महिलांची, त्यांचा कामाची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी.

# आकाशात भरारी घेणाऱ्या महिला वैमानिकांचा सन्मान

■ पुणे : (दै. संध्या)

आकाशात विमान चालविणाऱ्या महिला वैमानिकांपासून ते घरात राहून पुढील पिढी घडवणाऱ्या महिलांपर्यंत प्रत्येक स्त्री सशक्त आणि सामर्थ्यवान आहे. स्त्रीचे कर्तृत्व केवळ तिच्या व्यवसायावरून ठरत नाही, तर इतरांना घडवण्यात आणि त्यांना भरारी घेण्यासाठी बळ देण्यातही तिचे मोठे योगदान असते. मी वैमानिक असण्यापेक्षाही मोठे काम माझ्या आईने केले आहे. तिने आमचे पालनपोषण केले, आम्हाला घडवले आणि उडण्यासाठी पंख दिले. खऱ्या अर्थाने फेमिनिझम म्हणजे कधीतरी एक पाऊल मागे येणे, असे मत कॅप्टन गौरी बलकवडे यांनी व्यक्त केले.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने श्री महालक्ष्मी ट्रस्ट, सारसबाग यांच्या वतीने नऊ दिवस नऊ क्षेत्रांतील महिलांचा सन्मान करून स्त्रीशक्तीचा जागर करण्यात येतो. याच उपक्रमांतर्गत महिला वैमानिक कॅप्टन गौरी बलकवडे, कॅप्टन भाद्रवी गडकरी आणि कॅप्टन अपूर्वा गिलजे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी स्मित मच्छार यांच्या शौर्यालाही अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला पोलीस अधिकारी मिलिंद मोहिते, मंदिराचे विश्वस्त भरत अग्रवाल, उत्सवप्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी आणि प्रवीण चोरबेले उपस्थित होते. मंदिराचे संस्थापक व प्रमुख विश्वस्त राजकुमार अग्रवाल आणि प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

प्रत्येक स्त्री मग ती वैमानिक असो, नोकरी करणारी असो किंवा नोकरी न करणारी असो, तिच्यात सामर्थ्य आहे.



स्त्रीशक्तीचे महत्त्व जाणून घेणे हीच मोठी गोष्ट आहे.

फेमिनिझमच्या नावाखाली आपण वेगळ्याच मार्गाने जात आहोत. महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करताना त्याग, संस्कार आणि कुटुंबासाठी दिलेल्या योगदानाचे महत्त्वही लक्षात घेतले पाहिजे, अशा भावना महिला वैमानिकांनी व्यक्त केल्या.

मिलिंद मोहिते म्हणाले, नवरात्रीचे नऊ दिवस म्हणजे महिलांच्या कर्तृत्वाची पूजा करण्याचा काळ आहे. विविध क्षेत्रांतील महिलांचा सन्मान करण्याचा ट्रस्टचा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जनतेसाठी राज्य शासनाकडून स्वतःच्या बसची दिवाळी भाडेवाढ रद्द

**मुंबई : दैनिक संध्या**

दीपावलीनिमित्त 'एमएसआरटीसी' (MSRTC) एस.टी. गाड्यांची १५% प्रस्तावित भाडेवाढ रद्द करण्याच्या परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या निर्णयाचे 'सुराज्य अभियाना'ने स्वागत केले आहे. मात्र, खाजगी बसचालक आणि ऑनलाईनPortals कडून होणाऱ्या २००% ते ५००% बेकायदेशीर भाडेवाढीवर तातडीने कारवाई झाली नाही, तर हा दिलासा अपुरा ठरेल, असा इशारा अभियानाने दिला आहे. या निर्णयावर बोलतानासुराज्य अभियानाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे म्हणाले, केंद्र सरकारच्या सर्वेक्षणानुसार (MoSPI) ५५.८% नागरिक बसने प्रवास करतात आणि ७०.२% प्रवास हा कौटुंबिक किंवा धार्मिक कारणांसाठी असतो. सण-उत्सवाला घरी जाणाऱ्या सामान्य जनतेकडून ५ पट भाडे वसूल करणे ही सरळसरळ लूट आहे. शासन स्वतः भाडेवाढ नाकारते, मग २७ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयाचे (१.५ पट मर्यादा) उल्लंघन करणाऱ्या खाजगी बसमालक आणि ऑनलाईन पोर्टल्सवर कारवाई का नाही? मोटर वाहन कायद्याच्या कलम ८४(क) नुसार भाडेमर्यादा पाळणे ही परवान्याची पूर्वअट आहे. RedBus आणि MakeMyTrip सारखे एग्रिगेटर्स ऑटोमेटेड अल्गोरिदमद्वारे प्रवाशांचे शोषण करत आहेत. परिवहन आयुक्तांनी कलम ९३ अन्वये ऑनलाईन एग्रिगेटर्सना परवाना सक्तीचा करून त्यांच्या ॲप्सवरडिजिटलभाडेमर्यादालागूकरावी . तसेच, आरटीओ पथकांनी केवळ दंड न आकारता कलम ८६ नुसार गाड्यांचे परवाने निलंबित करावेत. सामान्य प्रवाशांना तक्रार करणे सोपे व्हावे, यासाठी ऑनलाईन किंवा ऑफलाईन तिकीट, ॲपवरूनडाऊनलोडकेलेलीतिकीटपीडीएफआणिबसच्या सीटमागे 'आर.टी.ओ. तक्रार क्यूआर कोड' (Grievance QR Code) छापण्याची अट परवाना मंजुरीसाठी अनिवार्य करावी," अशी मागणीही श्री. मुरुकाटे यांनी परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे. १.ऑनलाईन बुकिंग ॲप्सना एग्रिगेटर परवाना सक्तीचा करून त्यांच्या सिस्टीमवर एस.टी.च्या १.५ पट भाड्याची डिजिटल मर्यादा निश्चित करावी. २.फ्लाईंग स्क्वॉडद्वारे तपासणी करून जादा भाडे जागीच परत करावे आणि नियम मोडणाऱ्यांचे परवाने निलंबित करावेत. ३.तिकिटे, ऑनलाईन ॲप्स, पीडीएफ आणि बसच्या सीटवर आरटीओचा 'तक्रार क्यूआर कोड' छापणे ही परवाना मंजुरी व नूतनीकरणासाठी अनिवार्य अट करावी.

### निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात आपचे निगडीत घंटानाद आंदोलन

**पिंपरी-चिंचवड : दैनिक संध्या**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कथित पक्षपाती व मनमानी कारभाराचा निषेध करण्यासाठी तसेच निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणाच्या मागणीसाठी आम आदमी पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर शाखेच्या वतीने आज निगडी तहसील कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी 'घंटा वाजवा, देश जागवा!', 'एसआयआर रद्द करा' आणि 'मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार राजीनामा द्या!' अशा घोषणा देत निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात निषेध नोंदविला. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, स्वतंत्र आणि विश्वासार्ह असावी, अशी मागणी आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी यावेळी केली. प्रत्येक नागरिकाच्या मतदानाच्या मूलभूत लोकशाही अधिकारांचे संरक्षण झाले पाहिजे. निवडणूक प्रक्रियेबाबत नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण होण्यासाठी पारदर्शकता राखणे आवश्यक असल्याची भूमिका आंदोलकांनी मांडली. लोकशाही मूल्यांचे रक्षण आणि नागरिकांच्या हक्कांसाठी आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने यापुढेही संघर्ष सुरू ठेवण्यात येईल, असे वैजनाथ शिरसाट यांनी सांगितले. या आंदोलनावेळी आपचे नेते सुरेश गायकवाड, उपाध्यक्ष चंद्रमणी जावळे, युवक अध्यक्ष विकी पासोटे, पिंपरी विधानसभा अध्यक्ष ॲड. सुप्रिया गायकवाड, सुरेश बावनकर, आप नेत्या कविता कोंडे देशमुख, सुनंदा दुधाळ, यशवंत कांबळे, लक्ष्मण माने, राहुल मदने, मोहम्मद मोसीन, सीमा बावनकर, युवक उपाध्यक्ष शिवकुमार बनसोडे, युवक महासचिव अंकुश डोंगरे, युवक सचिव राजकुमार अडोळे, युवक सचिव गौतम अडसूळ, युवक सदस्य सोनू हिंगे, गौतम तायडे, सुरज झिटे, आदिनाथ जावीर, सिद्धार्थ पगारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्या वक्तव्यावर भाजप आमदार अमित गोरखे यांचा तीव्र संताप

**पिंपरी : दैनिक संध्या**

महाविकास आघाडीच्या सभेत काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय निवडणूक आयोग, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय जनता पक्ष आणि देशातील सुशिक्षित तरुणाईबाबत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन केलेले विधान अत्यंत बेजबाबदार आणि निंदनीय आहे. राजकीय फायद्यासाठी देशातील सुशिक्षित तरुणाईची तुलना अतिरेक्यांशी करणे, हा भारतीय युवाशक्ती आणि संविधानाचा घोर अपमान आहे, अशा शब्दांत भाजपा आमदार गोरखे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्या विधानाचा तीव्र निषेध केला. आमदार अमित गोरखे यांनी म्हटले आहे की, पाकिस्तानची भीती दाखवून तरुणांची दिशाभूल करण्यापेक्षा काँग्रेसने आपल्या सत्ताकाळातील तुष्टीकरण आणि पोसलेल्या दहशतवादाचा इतिहास आधी तपासून पाहावा. जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून द्वेषाचा चष्मा बाजूला ठेवून खासदार प्रणिती शिंदे यांनी आपल्या विधानाचा फेरविचार करावा आणि देशातील युवाशक्तीची जाहीर माफी मागावी. भारतीय जनता पक्षाची विचारसरणी ही 'राष्ट्रप्रथम' या तत्त्वावर आधारित आहे. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या खंबीर नेतृत्वाखाली आज भारतातील तरुण तंत्रज्ञान, इस्रो (ISRO), डिजिटल इंडिया आणि इनोव्हेशन क्षेत्रात संपूर्ण जगाचे नेतृत्व करत आहेत. असे असताना राजकीय स्वार्थासाठी युवाशक्तीचा आणि घटनात्मक संस्थांचा असा अवमान करणे म्हणजे थेट संविधानाचा आणि भारतीय तरुणांच्या कर्तृत्वाचा अपमान आहे. केंद्रीय निवडणूक आयोग ही कोणत्याही राजकीय पक्षाची बाहुली नसून, देशातील लोकशाहीचा कणा असलेली अत्यंत स्वायत्त आणि निष्पक्ष संविधानिक संस्था आहे. अपयशाच्या भीतीपोटी किंवा मतदारांचा कौल स्वीकारण्याचे धैर्य नसल्यामुळे निवडणूक आयोगासारख्या अत्यंत विश्वासार्ह संस्थेवर अशाप्रकारे बिनबुडाचे आरोप करणे, हा थेट भारतीय राज्यघटनेचा आणि लोकशाही प्रक्रियेचा घोर अपमान आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि त्यांच्या संपूर्ण टीमने नेहमीच निःपक्षपातीपणे, अत्यंत पारदर्शक वातावरणात आणि पारदर्शक तंत्रज्ञानाचा वापर करून जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली आहे. वैयक्तिक राजकीय स्वार्थासाठी अशा घटनात्मक संस्थांची विश्वासार्हता धुळीस मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की, भारत हा संविधानाने चालणारा देश आहे; आणि देशाचा डीएनए हा कोणत्याही राजकीय स्टंटबाजीतून नाही, तर भारतीय जनतेच्या स्वाभिमानी मतदानातून सिद्ध होतो. केंद्रीय निवडणूक आयुक्तांसारख्या घटनात्मक पदांवर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या राष्ट्रप्रेमी संघटनेवर बिनबुडाचे आरोप करून दिशाभूल करण्याचे काम काँग्रेस खासदार करत आहेत.

# वंचितांच्या विकासासाठी उपाय शोधा : शेख दाऊद

## एएसएम महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशनच्या उपक्रमाला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

■ काळदरी (दै. संध्या)



माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर येथे नवरात्रोत्सवानिमित्त विद्यार्थिनींच्या पारंपरिक कलागुणांना वाव देण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे जतन करण्याच्या उद्देशाने भोंडला कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमातून विद्यार्थिनींना पारंपरिक सण-उत्सवांची माहिती मिळाली, तसेच सामूहिक सहभाग, आनंद आणि सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीचा जागर करणारा आणि आदिशक्तीच्या उपासनेला समर्पित असलेला महत्त्वपूर्ण सण आहे. या उत्सवाच्या निमित्ताने शाळेत आयोजित करण्यात आलेल्या भोंडला कार्यक्रमामुळे शालेय परिसरात आनंददायी आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले. भोंडला हा महाराष्ट्रातील एक पारंपरिक लोकउत्सव असून, विशेषतः मुली आणि महिलांकडून तो मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या परंपरेतून निसर्गाविषयी कृतज्ञता, मैत्री, एकोपा आणि सामूहिक आनंदाची भावना व्यक्त होते.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी पारंपरिक पद्धतीने भोंडल्याची गाणी सादर केली. फेर धरून, तालबद्ध टाळ्यांच्या गजरात आणि उत्साहपूर्ण वातावरणात विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला. पारंपरिक लोकगीतांच्या माध्यमातून जुन्या सांस्कृतिक परंपरांची ओळख नव्या पिढीला करून देण्यात आली.

आधुनिकतेच्या युगात लोप पावत चाललेल्या लोकपरंपरांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि त्यांच्यामध्ये आपल्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. शालेय जीवनात अभ्यासाबरोबरच विविध सांस्कृतिक उपक्रमांना महत्त्वाचे स्थान असते. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळतो आणि समूहभावना विकसित होते. भोंडला कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना आपल्या परंपरा जपण्याची संधी मिळाली. कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थिनींचा उत्साह आणि आनंद पाहून शालेय परिसरात चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण झाले.माहूर माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा वारसा अनुभवता आला. शालेय स्तरावर अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये परंपरा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होण्यास मदत होते. अशा प्रकारे नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेला भोंडला कार्यक्रम आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमातून 'परंपरेचे जतन, संस्कृतीचे संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत लोककलेचा वारसा पोहोचवणे' हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार, त्याचप्रमाणे गावातील असंख्य महिला उपस्थित होत्या. विद्यालयातील शिक्षक महेंद्र भोसले, रामप्रभू पेटकर, इंद्रभान पठारे, विकास राऊत, श्रीकांत गव्हाणे इ. कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले होते.

## डिसेंबरमध्ये 'सेरेंडिपिटी आर्ट्स फेस्टिव्हल'चा सांस्कृतिक अनुभव घ्या

■ पुणे: (दै. संध्या)

यंदाच्या डिसेंबरमध्ये नेहमीच्या दिनचर्येतून थोडा विरंगुळा घेत गोव्यातील कला आणि संस्कृतीच्या अनोख्या विश्वाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. 'सेरेंडिपिटी आर्ट्स फेस्टिव्हल' हा आठ दिवसांचा कला महोत्सव १३ ते २० डिसेंबर २०२६ या कालावधीत गोव्यातील पणजी येथे आयोजित करण्यात आला आहे. संगीत, नाटक, चित्रपट, दृश्यकला, हस्तकला, डिझाइन आणि खाद्यसंस्कृती अशा विविध कलाप्रकारांचा अनुभव या महोत्सवात घेता येणार आहे. महाराष्ट्रातील प्रेक्षकांना गोव्याच्या सहलीसोबतच समृद्ध सांस्कृतिक अनुभवाची जोड देण्याची संधी या महोत्सवामुळे मिळणार आहे.

मुंबई आणि गोवा यांच्यात संगीत, स्थलांतर आणि विविध समुदायांच्या माध्यमातून दीर्घकाळापासून सांस्कृतिक संबंध निर्माण झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर पणजी येथे होणाऱ्या या महोत्सवात महाराष्ट्रातील प्रेक्षकांसाठी अनेक आकर्षणे असणार आहेत. मुंबईच्या सांस्कृतिक जीवनाशी जोडलेल्या संगीत आणि कथांपासून ते नाट्यप्रयोग, चित्रपट आणि समकालीन कलाविष्कारांपर्यंत अनेक गोष्टींचा अनुभव आठ दिवसांत घेता येणार आहे.

'ईस्ट इंडियन म्युझिक कंपनी' आणि 'जिझस बँड' हा यंदाच्या महोत्सवातील प्रमुख आकर्षणांपैकी एक आहे. अंकुर तिवारी यांनी या कार्यक्रमाचे संकलन केले आहे. . याशिवाय स्वानंद किरकिरे यांचा 'बावरा लाइव्ह' हा कार्यक्रम तसेच ताबा चाके, सुदान, हॅशबास लाइव्ह आणि रंज+ क्लिफर यांचे संगीत सादरीकरणही अनुभवता येणार आहे. स्वतंत्र संगीतप्रकारांमध्ये रस असणाऱ्यांसाठी महोत्सवाचा स्वतंत्र संगीत उपक्रम असलेल्या 'बी-साइड' अंतर्गत १६ ते १९ डिसेंबर दरम्यान आर्ट पार्क येथे किस नुका (लाइव्ह), डायरेक्ट ड्राइव्ह (व्हिनाइल), मॅरियन हॉक्स, पॅनेलिया आणि शेरल यांचे कार्यक्रम होणार आहेत.

## मुंबई महानगर पालिका शाळांमध्ये संविधान विषय शिकविण्यासाठी शिक्षण समिती सदस्य योजना ठोकळे यांना यश

■ मुंबई : (दै. संध्या)



विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनात असतांनाच जर, संविधान, संविधानिक मूल्य, मूलभूत हक्क, नागरिकांची कर्तव्य, संविधानिक जबाबदाऱ्या, लोकशाही, संसदीय कार्यपद्धती या गोष्टी त्यांच्या शालेय जीवनापासून शिकवल्या गेल्या तर येणारी पिढी ही अत्यंत जबाबदार नागरिक म्हणून पूढे येईल. देश घडवण्यासाठी त्यांना कुणाच्याही मार्गदर्शनाची गरज भासणार नाही, कारण त्यांची जडणघडणच अश्या वातावरणात झालेली असेल की ही येणारी पिढी स्वतःच एक आदर्श नागरिक म्हणून पुढे येईल आणि याच उद्देश्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये भारतीय संविधान शिकवले जावे यासाठी मुंबई मनपा शिक्षण समिती सदस्य तथा मुंबई भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा योजना ठोकळे यांनी पाठपुरावा करून विषय मांडला.मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी या प्रस्तावाचा गांभीर्याने विचार केला आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग आणि प्रशासनाचा पाठपुरावा केला.मा आमदार अमित साटम साहेब यांच्या प्रयत्नांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय संविधान, सविधानिक मुल्य, कर्तव्य , जबाबदाऱ्या याचा अभ्यास आलेल्या

" स्मार्ट नागरिक" [ नागरिक शास्त्र व घटनात्मक मूल्यांवर आधारित] आणि "विद्यार्थी प्रेरणा" या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते पार पडले . या कार्यक्रमास मुंबई भाजप अध्यक्ष, आमदार अमित साटम, महापौर,रितूताई तावडे, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार महेश सावंत, उपमहापौर संजय घाडी, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, सार्वजनिक आरोग्य समितीचे अध्यक्ष हरीश भांदिर्गे, शिक्षण समिती अध्यक्षा श्रीमती राजेश्री शिरवडकर, शिवसेना गटनेता अमेय घोले आदी मान्यवर उपस्थित होते.

## चाकण मधील स्वच्छतेसाठी लोकप्रतिनिधी मैदानात

■ चाकण : (दै. संध्या)




स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त चाकण शहराच्या निर्मितीसाठी चाकण नगर परिषदेच्या वतीने प्रभाग क्रमांक एकमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छतेसाठी लोकप्रतिनिधी मैदान उतरल्याने ग्रामस्थांना श्रमदानातून स्वच्छतेचा संदेश मिळाला.

स्वच्छता मोहिमेत नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेवक मंगेश कांडगे, मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व नगरपरिषदेचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लोकप्रतिनिधींनी स्वतः हातात झाडू घेऊन श्रमदान केल्याने स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या मोहिमेअंतर्गत महात्मा फुले मार्केट यार्ड, बकरी बाजार, बैल बाजार आणि रोहकल रोड या महत्त्वाच्या परिसरांची स्वच्छता करण्यात आली.

रोहकल रस्ता परिसरातील कचरा, प्लास्टिक आणि पालापाचोळा हटविण्यावर भर देण्यात आला. वर्दळीच्या ठिकाणी स्वच्छता राखण्यासोबतच सार्वजनिक ठिकाणी कचरा साचू नये, यासाठीही जनजागृती करण्यात आली. शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी केवळ नगर परिषदेची नसून प्रत्येक नागरिकाचीही आहे,

हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकारी प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमेत सहभागी झाल्याने या भागातील नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. स्वच्छ चाकण, सुंदर चाकण हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नगर परिषदेकडून स्वच्छता मोहिमेस प्राधान्य देण्यात येत असून, शहरातील नागरिकांनीही सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, गटनेते नितीन गोरे व नगरसेवक मंगेश कांडगे आदींनी या उपक्रमातून केले आहे.

## अवधूत गुप्तेंच्या तालावर विक्रोळीकर थिरकले

■ मुंबई : (दै. संध्या)



भाजप आमदार मिहीर कोटेचा यांच्या वतीने विक्रोळी पूर्वेतील कन्नमवार नगर येथील छत्रपती संभाजी महाराज मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या 'उत्सव आदिशक्तीचा, जागर मराठी मनाचा' या मराठी दांडिया महोत्सवाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली. यावेळी प्रसिद्ध गायक आणि रॉकस्टार अवधूत गुप्ते यांच्या अदाकारीने दांडिया रसिकांना मंत्रमुग्ध केले. उत्साहपूर्ण वातावरणात रंगलेल्या या महोत्सवात मुख्यमंत्र्यांनीही सहभागी नागरिकांचा दांडिया पाहत आनंद लुटला.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहिले असता, विक्रोळी पूर्व भाजप मंडळाच्या अध्यक्षा केतकी सांगळे आणि तृप्ती घोंगळे यांनी त्यांना देवीची मूर्ती भेट दिली. ईशान्य मुंबई भाजपचे अध्यक्ष दीपक दळवी यांनी मुख्यमंत्र्यांचा शाल घालून सत्कार केला. याप्रसंगी माजी आमदार मंगेश सांगळे, माजी नगरसेवक प्रवीण छेडा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या महोत्सवाचे हे पाचवे वर्ष असून, १५ ते १९ ऑक्टोबरदरम्यान त्याचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी संस्कृती, परंपरा आणि वेशभूषेला प्रोत्साहन देणे हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. दररोज उत्कृष्ट मराठमोळी वेशभूषा करणाऱ्या दोन महिला आणि दोन पुरुषांची निवड करून त्यांना प्रत्येकी एक आयफोन देण्यात येणार आहे.

# नंदिता काळभोर यांचा प्रधानमंत्री मातृवंदना पुरस्काराने गौरव

■ मुंबई (दै. संध्या)



महिला व बालविकास विभागाच्या प्रधानमंत्री मातृवंदना योजनेची (PMMVY) विक्रोळी-भांडुप नागरी प्रकल्पात अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी केल्याबद्दल *मुख्यसेविका श्रीमती नंदिता काळभोर* यांना मुंबई उपनगर जिल्हा प्रशासनाच्या वतीने *'उत्कृष्ट कामगिरी पुरस्कारा'ने* सन्मानित करण्यात आले.

चेंबूर येथील फाईन आर्ट सोसायटी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी *एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्याच्या आयुक्त मा. श्रीमती माधवी सरदेशमुख (भा.प्र.से.)* होत्या. यावेळी व्यासपीठावर सह-आयुक्त श्रीमती संगीता लोंढे, उपायुक्त (सनियंत्रण) श्री. अब्दुल चौधरी, मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोडल अधिकारी श्रीमती प्रेमा घाटगे आणि PMMVY चे नोडल अधिकारी श्री. शरद कुऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विक्रोळी-भांडुप हा लोकसंख्येच्या दृष्टीने मोठा आणि आव्हानात्मक प्रकल्प समजला जातो. अशा ठिकाणी नंदिता काळभोर यांनी आपल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या टीमला सोबत घेऊन घरोघरी जाऊन पात्र गरोदर मातांची नोंदणी केली. योजनेअंतर्गत मिळणारे ५००० रुपयांचे अनुदान लाभार्थींच्या थेट बँक खात्यात वेळेत जमा व्हावे यासाठी त्यांनी विशेष पाठपुरावा केला.

याशिवाय गरोदर व स्तनदा मातांमध्ये आरोग्य, पोषण आहार आणि संस्थात्मक प्रसूतीबाबत जनजागृती निर्माण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या या पारदर्शक आणि तळमळीच्या कामाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या सोहळ्यात '५००० वाली दीदी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंगणवाडी सेविकांचाही विशेष सत्कार करण्यात आला. लाभार्थी महिलांमध्ये विश्वास निर्माण करून योजना घराघरात पोहोचवणाऱ्या या सेविका खऱ्या अर्थाने योजनेच्या यशाचे शिल्पकार असल्याचे गौरवोद्गार आयुक्त माधवी सरदेशमुख यांनी काढले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पवना नदीवरील पाडलेला बंधारा पुन्हा बांधण्याची आयुक्तांकडे मागणी

**पिंपरी: दैनिक संध्या**

पिंपरी मिलिटरी डेअरी फार्म आणि पिंपळे सौदागर परिसरातील पवना नदीवर पूर्वी अस्तित्वात असलेला बंधारा पुन्हा बांधण्यात यावा, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोल उबाळे यांनी केली आहे. यासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले असून, काही वर्षांपूर्वी पाडण्यात आलेल्या या बंधाऱ्यामुळे परिसराची झालेली दयनीय अवस्था आणि पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पत्रात म्हटले आहे की, काही वर्षांपूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मच्छरांच्या उपद्रवाचे कारण पुढे करत, हा बंधारा पाडण्यासाठी डेअरी फार्म प्रशासनाला निधी उपलब्ध करून दिला होता. त्यानंतर हा बंधारा पाडण्यात आला. मात्र, तेव्हापासून नदीपात्रात पाणी साठणे बंद झाल्याने या महत्त्वपूर्ण जलस्रोताची अवस्था अत्यंत दयनीय व एका गटारासारखी झाली आहे. हा बंधारा उभा असताना पिंपरीगाव, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी, थेरगाव आणि चिंचवड या संपूर्ण परिसरातील पवना नदी वर्षभर पाण्याने भरलेली असायची. डेअरी फार्ममधील गायी-म्हशींसह परिसरातील जनावरांना या पाण्याचा मोठा आधार होता. तसेच, भूजलाच्या उच्च पातळीमुळे आजूबाजूच्या गावातील विहिरी आणि बोअरवेलना वर्षभर पाणी असायचे. परंतु, बंधारा नष्ट केल्यापासून भूजल पातळी वेगाने खालावली असून नदीपात्रात केवळ दुर्गंधीयुक्त सांडपाणी वाहत असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सध्या काही स्वार्थी बांधकाम व्यावसायिक पूररेषा मर्यादित ठेवण्याच्या कारणावरून या बंधाऱ्याच्या पुनर्बाधणीला अप्रत्यक्ष विरोध करत आहेत. मोजक्या बिल्डरांच्या व्यावसायिक फायद्यासाठी आणि दबावामुळे या महत्त्वाच्या सार्वजनिक कामाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप उबाळे यांनी केला आहे. जनहित आणि पर्यावरण रक्षणाला प्राधान्य देऊन प्रशासनाने कोणत्याही दबावाखाली न येता, पिंपरी डेअरी फार्म व पिंपळे सौदागर येथील पाडलेल्या बंधाऱ्याची त्वरित पुनर्बाधणी करावी, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषदेत स्त्रीशक्ती, नेतृत्व अन् मानसिक स्वास्थ्यावर मंथन

**पिंपरी: दैनिक संध्या**

बौद्ध धम्मातील प्रज्ञा, करुणा, सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या मूल्यांना अधोरेखित करत महिला नेतृत्व, ऐतिहासिक योगदान, जागतिक भिक्खुनी परंपरा आणि मानसिक स्वास्थ्य अशा विविध विषयांवर चिंचवड येथे शनिवारी (दि. १७) आयोजित आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषदेत विचारमंथन करण्यात आले. डॉ. उज्ज्वला अंदुरकर, डॉ. संध्या हरिभक्त, डॉ. वैशाली भामरे, लक्ष्मीकांता माने यांनी या परिषदेचे आयोजन केले होते. विस्डम इन मोशन, कॅटलिस्ट फाउंडेशन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ही परिषद पार पडली. या परिषदेत ज्ञानातून नेतृत्व, संवादातून समाजनिर्मिती करण्याच्या तसेच बौद्ध मूल्ये समाजात रुजवण्याविषयी चर्चा करण्यात आली. परिषदेला सुमारे एक हजार उपासक-उपासिकांनी उपस्थिती लावली. देश-विदेशांतील बौद्ध भिक्खुनी, अभ्यासक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्त्या आणि विविध क्षेत्रांतील महिलांनी परिषदेत सहभाग घेतला. बुद्ध अँथमवरील नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर व्हिएतनामी बौद्ध परंपरेतील मंत्रोच्चार सादर करण्यात आले. परिषदेच्या प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. विमल थोरात यांनी बुद्धांचा आणि आंबेडकरी विचार पुढे चालू ठेवण्यासाठी यापुढे जेन झी पिढीने पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन केले. त्याचबरोबर बाबासाहेबांच्या शिक्षित बना या आवाहनाला महिलांनी गांभीर्याने घेतले असून नवी 'शिक्षित पिढी' घडवण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असल्याचे मत व्यक्त केले. विशेष अतिथी, मिलिंद महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान यांनी, बोधगया महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याची तसेच स्वतंत्र पाली विद्यापीठ महाराष्ट्रात स्थापन करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेण्याची मागणी केली. त्याचबरोबर पुढची परिषद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयात घेण्याचे निमंत्रण दिले. प्रा. मनोरी पी. सेनानायके यांनी 'बौद्ध मूल्ये, सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्व' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी बहुजन हिताय, बहुजन सुखाय या मूल्यांवर आधारित असणारा बुद्धिजम एक आदर्श जीवनमार्ग असल्याने ही मूल्ये समाजात रुजवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे मत व्यक्त केले. यावेळी भिक्खुनी महाकासा यांनी कोरियन भिक्खुनी संघाची जागतिक स्तरावरील प्रेरणादायी भूमिका या विषयावर व्हिडिओद्वारे विचार मांडले. डॉ. रुपाली भामरे मून यांनी परदेशातील आंबेडकरी विचारांचा प्रसार आणि भारतीय समुदायाची भूमिका या विषयावर भाष्य केले.

### पिंपरी-चिंचवडमध्ये कचऱ्याचे गणित बिघडले

**पिंपरी: दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहरात दररोज 1 हजार 500 टन कचरा जमा होतो. मात्र, सध्या सुमारे 2 हजार 100 टन कचरा गोळा केला जात आहे. वजन आणि फेरीनुसार महापालिकेकडून ठेकेदारांना बिले दिली जातात. कचरा डेपो बंद असल्याने साचलेला कचरा अजूनही उचलण्याचे काम केले जात असल्याने कचऱ्याचे वजन वाढल्याचा दावा अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे. तर, वजन वाढवण्यासाठी शहराच्या सीमेवरील भागांतील कचरा गोळा केला जात असल्याचा आरोप केला जात आहे. शहराची लोकसंख्या 30 लाखांपुढे गेली असून, शहरात दररोज 1 हजार 500 टन ओला व सुका असा कचरा जमा केला जातो. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत घरोघरचा कचरा गोळा करणे, मोशी कचरा डेपोपर्यंत त्याची वाहतूक करणे या कामासाठी बीव्हीजी इंडिया लिमिटेड आणि ॲन्टोनी लारा ठेकेदार कंपन्यांना काम दिले आहे. मात्र, सध्या शहरातील काही भागात कचरा संकलनाचे कामकाज विस्कळीत झाले आहे. कचरा संकलन करून मोशी येथे कचरा डंम्प केला जातो. डेपोत कचऱ्यावर कॅपिंग, लॅण्ड फिलिंग अर्थात शास्त्रीय भूभरण, यांत्रिकी खत प्रक्रिया, गांडूळ खत प्रकल्प, वेस्ट टू एनर्जी, सीएनजी निर्मिती अशा माध्यमातून कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. आठ जुलैच्या दुर्घटनेपासून वेस्ट टू एनर्जी प्रकल्प बंद आहे. तसेच, बायोमायनिंग केले जात आहे. असे असूनही, डेपोतील कचरा कमी होण्याऐवजी वाढतच आहे. मोशी डेपोत 8 जुलैला झालेल्या दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर शहरात कचरा समस्या निर्माण झाली आहे. शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग तयार झाले आहे. सध्या शहरात जमा झालेले ढीग डेपोत नेऊन टाकला जात आहे. त्यामुळे कचऱ्याचे वजन वाढल्याचे दावा आरोग्य विभागाने केला आहे. शहरात दररोज 1 हजार 500 टन कचरा जमा होतो, असे आरोग्य विभागाचे म्हणणे आहे. मात्र, महापालिकेच्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालात 1 हजार 800 टन कचरा गोळा होतो, असा दावा पर्यावरण सद्यस्थिती अहवालात करण्यात आला आहे. तर आता प्रत्यक्षात 2 हजार 100 टन कचरा जमा होत असल्याची माहिती समोर आली आहे. कचऱ्याच्या वजनाच्या आकडा प्रत्येक विभागाकडून वेगवेगळा आहे. तसेच, ठेकेदारांनी त्यांच्या भागात कचरा संकलनाचा उपठेका दिला आहे.



## श्री. जैन विद्यालयाच्या १९८५ बॅचचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न!

■ चिंचवड : (दै. संध्या)

श्री. जैन विद्यालय, चिंचवड स्टेशन येथील इयत्ता दहावीच्या १९८५ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी चिंचवड येथील रेस्टॉरंट बर्ड व्हॅली येथे अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक व दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. तब्बल चार दशकांनंतर गुरुजन आणि माजी विद्यार्थी एकत्र आल्याने संपूर्ण कार्यक्रमात जुन्या आठवणी, कृतज्ञता आणि स्नेहभाव यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

कार्यक्रमाच्या दालनात गुरुजनांचे आगमन होताच उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करून उत्स्फूर्त स्वागत केले. यानंतर उपस्थित शिक्षकांना मानपत्र, पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. शाळेतील कार्यालयीन कर्मचारी आणि शिपाई यांनाही मोमेंटो देऊन गौरविण्यात आले.

या मेळाव्याला श्री. जैन विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष मा. ना. श्री. अण्णा बनसोडे आणि महाराष्ट्र राज्य लेखा-जोखा समितीचे माजी अध्यक्ष (कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा) श्री. सचिन पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या दोन्ही मान्यवरांचा सत्कार श्री. घनश्यामकांबळे सर व श्री. दिनेश नाकाडे सर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी श्रीम. शैलजा पुसाळकर बाई, श्रीम. राधा परांडे बाई, श्रीम. माधवी गाडगीळ बाई, श्रीम. मधुबाला पटवा बाई, श्री. घनश्याम कांबळे सर, श्री. एकनाथ भडके सर, श्री.दिनेश नाकाडे सर, श्री. सोपान सावंत सर, श्री. गंगाधर शिरसाठ सर, श्री. काशिनाथ सदाफुले सर, श्री. अंकुश खामगळ सर आणि श्री. बाळासाहेब पाटील सर हे शिक्षक उपस्थित होते. तसेच कार्यालयीन कर्मचारी श्री. प्रेमसुख कटारिया, श्री.मदनलाल बागमार आणि शिपाई श्री.सुभाष मुनोत व श्री. चंद्रकांत गडकर यांचीही उपस्थिती होती.

शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या मानपत्राचे वाचन श्री. ज्योत सोनवणे यांनी केले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्री. घनश्याम कांबळे सर, श्री. दिनेश नाकाडे सर, श्री.बाळासाहेब पाटील सर आणि श्रीम. मधुबाला पटवा बाई यांनी आपले मनोगत व्यक्त केले. इतक्या सुंदर नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित केलेला माजी विद्यार्थी मेळावा आपण पहिल्यांदाच अनुभवत असल्याची भावना शिक्षकांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी चार दशकांनंतरही आपल्या गुरुजनांची आठवण ठेवून केलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून शुभांगी गराडे आणि ज्योत सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेत शिक्षकांनी दिलेले ज्ञान, संस्कार, शिस्त आणि मार्गदर्शन यांच्यामुळेच आज सर्व माजी विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकल्याची कृतज्ञतापूर्ण भावना त्यांनी व्यक्त केली.

मा. ना. श्री. अण्णा बनसोडे आणि श्री. सचिन पटवर्धन यांनीही आपल्या मनोगतातून शाळेविषयीच्या आठवणी जागवल्या आणि शाळेने दिलेल्या संस्कारांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या वेळी उपस्थितांमध्ये जुन्या आठवणींना उजाळा देत आनंदाचे आणि भावनिक क्षण अनुभवायला मिळाले.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्री. प्रशांत काटवटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. रामचंद्र पांचाळ यांनी केले. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. मारुती बहिरवाडे, श्री. संजय दातीर पाटील, श्री. संपत पोटघन, श्री. प्रसाद भागवत, श्री. प्रविण भालेराव, श्री. कैलास गिराम, श्री. प्रशांत काटवटे, श्री. ज्योत सोनवणे, श्री. सुनील येळवंडे,श्री. धनंजय गाडे पाटील आणि श्रीमती सविता पाटणे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व माजी विद्यार्थ्यांना मोमेंटो देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घेत गुरुजन आणि माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. गुरुजनांप्रती कृतज्ञता, मित्रत्वाचे अतूट बंध आणि शालेय जीवनातील सुवर्णक्षण पुन्हा अनुभवण्याची संधी देणारा हा स्नेहमेळावा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

## 'वायसीएम'मध्ये स्वतंत्र 'सेप्टिक ऑपरेशन थिएटर' तातडीने सुरू करा; आमदार महेश लांडगे

■ पिंपरी (दै. संध्या)

संसर्गजन्य जखमा आणि शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात स्वतंत्र 'सेप्टिक ऑपरेशन थिएटर' तातडीने कार्यान्वित करावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देऊन आवश्यक प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसह कालबद्ध कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ४० लाखांच्या घरात पोहोचली असून, वाढत्या लोकसंख्येसोबत सार्वजनिक आरोग्यसेवेवरील ताणही वाढत आहे. सर्वसामान्य नागरिक, कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी वायसीएम रुग्णालय हा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे येथील उपचार सुविधा अधिक सक्षम आणि अद्ययावत करणे आवश्यक असल्याचे लांडगे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

निवेदनानुसार, वायसीएम रुग्णालयात संसर्गजन्य जखमा असलेल्या रुग्णांच्या शस्त्रक्रियांसाठी स्वतंत्र सेप्टिक ऑपरेशन थिएटरची आवश्यकता आहे. ही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे काही रुग्णांना इतर रुग्णालयांत हलवावे लागते किंवा उपचारांना विलंब होतो. परिणामी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना प्रवासाचा खर्च, आर्थिक भार आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो. खासगी रुग्णालयांतील उपचार परवडत नसलेल्या कुटुंबांसाठी ही परिस्थिती विशेषतः अडचणीची ठरत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. संसर्गजन्य जखमा, पूयुक्त किंवा खराब झालेल्या जखमा आणि शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारल्यास वायसीएममध्येच उपचार देणे शक्य होईल. तसेच संसर्ग नियंत्रण आणि इतर रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवता येतील, असे निवेदनात म्हटले आहे.

स्वतंत्र सेप्टिक ऑपरेशन थिएटरसाठी आवश्यक जागा, उपकरणे, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि निधीचा तातडीने आढावा घेण्याची मागणी लांडगे यांनी केली आहे. संबंधित प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता द्यावी.

## पिंपरी-चिंचवडमध्ये संघाचे ५० ठिकाणी विजयादशमी उत्सव

■ पिंपरी (दै. संध्या)

हिंदू समाज संघटन, राष्ट्रहित आणि सेवाकार्यासाठी कटिबद्ध असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे पिंपरी-चिंचवड शहरात यंदा ५० ठिकाणी विजयादशमी शस्त्रपूजन उत्सव, तर २७ ठिकाणी पथसंचलनांचे आयोजन करण्यात आले आहे. हे उत्सव १८, २०, २४ आणि २५ ऑक्टोबर रोजी शहरातील विविध भागांत होणार आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे दरवर्षी विजयादशमीनिमित्त शस्त्रपूजन उत्सवांचे आयोजन केले जाते. यंदा चिंचवड, पिंपरी, काळेवाडी-रहाटणी, पिंपळे निलख, पिंपळे सौदागर, रावेत, आकुर्डी, वाकड, हिंजवडी, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, संत तुकारामनगर, सांगवी, पिंपळे गुरव, कासारवाडी, देहू, देहूरोड, चिखली, निगडी, संभाजीनगर, आळंदी, चऱ्होली, दिघी, मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगर या भागांत उत्सव होणार आहेत. या उत्सवांमध्ये पारंपरिक शस्त्रपूजनासह विविध शारीरिक प्रात्यक्षिके, घोष प्रात्यक्षिके आणि गीतगायनाचे कार्यक्रम होणार आहेत. तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून, संघाच्या प्रमुख कार्यकर्त्यांकडून उपस्थितांना मार्गदर्शन केले जाणार आहे. शहरातील विविध भागांत होणाऱ्या या उत्सवांच्या माध्यमातून संघाचे कार्य, शिस्त आणि सेवाभावी उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. या विजयादशमी शस्त्रपूजन उत्सवांमध्ये नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड जिल्हा संघचालक विनोद बन्सल यांनी केले आहे.

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशनच्या उपक्रमाला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पिंपरी (दै. संध्या)

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी पारंपरिक चौकटी बाहेर विचार करून वंचितांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी उपाय शोधावेत असे आवाहन डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे नात पुतणे आणि अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशनचे संस्थापक सदस्य शेख दाऊद यांनी केले. डॉ. कलाम यांच्या विचारांचा अभ्यास करून सर्वांनी विकसित भारताच्या उभारणीत योगदान द्यावे असेही शेख दाऊद म्हणाले.

माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून पिंपरी येथील औद्योगिक शिक्षण मंडळाच्या (एएसएम) शैक्षणिक संकुलात आयोजित केलेल्या 'कलाम स्ट्रीम चॅलेंज २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी ते बोलत होते.

या स्पर्धेला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील ९० शाळा, २५२ महाविद्यालयातील १००० विद्यार्थी आणि २०० पेक्षा जास्त शिक्षकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आरोग्य, कृषी, हरित ऊर्जा आणि सामाजिक विकासाशी संबंधित १५० हून अधिक नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले.

१०० पेक्षा अधिक शिक्षण तज्ज्ञ आणि शास्त्रज्ञांनी याचे परीक्षण केले. विजेत्या निवडक १०० विद्यार्थ्यांची श्रीहरिकोटा येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली.

## आम आदमी पार्टीच्या वतीने पिंपरी-चिंचवडमध्ये घंटानाद आंदोलन

■ पिंपरी (दै. संध्या)




मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पक्षपाती व मनमानी कारभाराच्या विरोधात तसेच निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने आज निगडी तहसील कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान "घंटा वाजवा, देश जागवा!", "SIR रद्द करा" आणि "मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार राजीनामा द्या!" अशा घोषणा देत निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात निषेध व्यक्त करण्यात आला.

आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, स्वतंत्र आणि विश्वासार्ह असावी, अशी मागणी केली. नागरिकांच्या मतदानाच्या मूलभूत लोकशाही अधिकारांचे संरक्षण झाले पाहिजे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

यावेळी आम आदमी पार्टी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट यांच्या कडून SIR रद्द करणे, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेणे आणि निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करणे, या प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवड शहर लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी आणि नागरिकांच्या हक्कांसाठी आपला संघर्ष पुढेही सुरू ठेवणार असल्याचे वैजनाथ शिरसाट यांनी म्हटले यावेळी आप नेते सुरेश गायकवाड, उपाध्यक्ष चंद्रमणी जावळे, युवक अध्यक्ष विकी पासोटे, पिंपरी विधानसभा अध्यक्ष ॲड. सुप्रिया गायकवाड, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## चिंचवडमध्ये नाना पाटेकर, मधू कांबीकर यांच्या स्मृतींना उजाळा

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहर कलाप्रेमी मंचाच्या वतीने चिंचवड येथील तारांगण सभागृहात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि अभिनेत्री मधू कांबीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कलाकार, साहित्यिक आणि पत्रकारांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षस्थानी पद्मश्री गिरीश प्रभुणे होते.

यावेळी नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, ज्येष्ठ कलावंत वसंत अवसरीकर, लेखक प्रभाकर ओव्हाळ, काँग्रेस शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, निहाल पानसरे, आणि साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजन लाखे आदी उपस्थित होते.

गिरीश प्रभुणे यांनी मधू कांबीकर यांनी, कोल्हाटी समाजासाठी केलेल्या कार्याचे स्मरण केले. तर भाऊसाहेब भोईर यांनी कलाकार कधीच आपल्या आठवणींतून दूर जात नाही, असे सांगत त्यांच्या कलेचा वारसा कायम जिवंत राहत असल्याची भावना व्यक्त केली.

ज्येष्ठ कलावंत वसंत अवसरीकर यांनी, मधू कांबीकर यांच्यासोबत नाटक आणि चित्रपटांमध्ये काम करतानाचे अनुभव सांगत मधुताई आणि ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांच्या आठवणींना उजाळा दिला.

पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी नाना पाटेकर यांच्या भेटीचा प्रसंग सांगितला. ते म्हणाले की, नाना पाटेकर




हे एक वेगळेच रसायन असलेले अभिनेते होते. डॉ. श्रीराम लागू यांच्या प्रमाणे वेळोवेळी त्यांनी भूमिका घेतली. पु ल देशपांडे प्रकरणात शिवसेनाप्रमुखांना एक दिवस मागे वळून पाहाल तर एकटेच उरलेले असाल हा नानांनी घेतलेला चिमटा, देवेंद्र फडणवीस यांना भाषण छान करतोस मात्र ओरडून बोलू नकोस नाहीतर त्रास होईल तुला हा त्यांनी दिलेला सल्ला, एका वृत्तपत्राच्या कार्यक्रमात बोलताना राजकीय मंडळींची प्रॉपर्टी निवडून आल्यावर वर्षभरात वाढते कशी हा त्यांनी केलेला सवाल सामान्य माणसाच्या भावना व्यक्त करणारा होता. नानांनी धीर गंभीर बंडखोर विनोदी सगळ्या भूमिका जीव ओतून केल्या. असे सातुर्डेकर म्हणाले. दादा आढाव यांनी मधू कांबीकर यांच्यासोबतच्या शालेय जीवनातील आठवणी सांगितल्या. अश्विनी सातव यांनी दोन्ही कलाकारांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजात माणुसकी जपण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन पत्रकार गोविंद वाकडे यांनी केले, पत्रकार व लेखक विजय जगताप यांनी प्रास्ताविक केले. अविनाश कांबीकर यांनी श्रद्धांजली अर्पण करून सभेचा समारोप केला. या कार्यक्रमासाठी अनिल माने, प्रवीण तुपे, अनिस पठाण, विष्णू मांजरे, गणेश दिघे व नितीन भोगले यांनी पुढाकार घेतला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आरोग्य सेवा,गावचा विकास,निरोगी गाव हेच आमचे ध्येय : सरपंच विनायक गायकवाड

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

निरोगी गाव, सुदृढ नागरिक या उक्तीप्रमाणे, गावातील नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे, विविध आजारांचे वेळेवर निदान करणे आणि नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करणे, या उद्देशाने विविध आजारांवर, रोगांवर निदान,शरीराच्या सर्व आरोग्य तपासणी अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामपंचायत कोलवडी-साष्टे यांच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत राबविण्यात येणाऱ्या असे उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. नागरिकांचे आरोग्य, गावाचा विकास आणि निरोगी समाजनिर्मिती हेच आमचे ध्येय असल्याचे मत कोलवडी-साष्टे ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त आदर्श सरपंच विनायक गायकवाड यांनी व्यक्त केले. कोलवडी-साष्टे येथे अस्थिघनता तपासणी शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. आर.के. मेडिटेक, ग्रामपंचायत कोलवडी-साष्टे तसेच आयुष्मान आरोग्य मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने अस्थिघनता तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण १३० नागरिकांची हाडांच्या घनतेची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान ६ नागरिकांना हाडे ठिसूळ होण्याचा आजार (अस्थिसुषिरता),तर ८९ नागरिकांमध्ये हाडांची घनता कमी झाल्याचे(अस्थिक्षयाची पूर्वावस्था) आढळून आले. याचे वेळीच निदान झाल्यामुळे संबंधित नागरिकांना योग्य उपचार सुरू करून भविष्यातील संभाव्य आरोग्यविषयक गुंतागुंत टाळणे शक्य झाले आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हे शिबिर अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले असून,वेळीच निदान आणि योग्य उपचारांच्या माध्यमातून नागरिकांचे आरोग्य जपणे,हीच या शिबिराची खरी फलश्रुती ठरली आहे.या शिबिराला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभला. आरोग्य विभागाचे मोलाचे सहकार्य या शिबिराच्या आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, वाघोली येथील वैद्यकीय अधिकारी तसेच सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदर शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.ऐश्वर्या महामुनी, आरोग्य सेविका मनीषा डूचे, शांताराम खरात व आरोग्य सेवक प्रतिक शेलार तसेच जयश्री घुमे, वृदवणा आगलावे, ज्योती नितनवरे आणि आशा सेविका अर्चना नागने यांनी विशेष परिश्रम घेतले.

### शिरूरमध्ये बलेनो कार मधून आलेल्यांचा धुडगूस; रुमियन कार अडविण्याचा प्रयत्न

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

शिरूर येथील सतरा कमान पुलाजवळ अहिल्यानगर-पुणे महामार्गावर पांढऱ्या रंगाच्या नंबर प्लेट नसलेल्या बलेनो कारमधून आलेल्या ४ ते ५ अनोळखी व्यक्तींनी टोयोटा रुमियन कारचा पाठलाग करून ती अडविण्याचा प्रयत्न केल्याची घटना १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली. नियाज अब्दुल सकूर राईन हे पुण्याच्या दिशेने जात असताना आरोपींनी फलकेमळा चौकाजवळ त्यांची कार आडवी लावली. वाहनाचे हप्ते थकल्याचे सांगून कार थांबविण्यास भाग पाडले तसेच चावी काढण्याचा प्रयत्न केला. कारमधील ॲड. उज्ज्वला पवार यांनी पोलिस येत असल्याचे सांगताच संबंधित व्यक्तींनी घटनास्थळावरुन पळ काढला. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९२१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १२६(२) व १२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार खेडकर करीत असून, आरोपींची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

### शिरूरच्या मळगंगा ज्वेलर्समधून २.१७ लाखांची सोन्याची चैन चोरी

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

शिरूर शहरातील सुभाष चौक येथील मळगंगा ज्वेलर्स या सराफ दुकानातून सोन्याची चैन चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सोन्याची चैन खरेदी करण्याच्या बहाण्याने आलेल्या दोन अनोळखी महिलांनी सुमारे दीड तोळे वजनाची, २ लाख १७ हजार ५०० रुपये किमतीची चैन चोरून नेल्याची फिर्याद दाखल करण्यात आली आहे. ही घटना १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३५ ते ६ वाजण्याच्या दरम्यान घडली. दुकानातील कर्मचारी सोन्याच्या चेन दाखवत असताना संबंधित महिलांनी नजर चुकवून चैन लंपास केली.याप्रकरणी दुकानमालक राजेंद्र अरुण लोळगे यांच्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९२०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे करीत आहेत.

### कचरा टाकण्यास विरोध केल्याने ज्येष्ठ नागरिकाला मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

मंदिरासमोरील मोकळ्या जागेत कचरा टाकण्यास विरोध केल्याच्या कारणावरून ६८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला झाडूचा दांडा व विटेने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना शिरूर शहरातील सरदार पेठ येथे घडली. १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.४५ वाजण्याच्या सुमारास चामुंडा माता मंदिरासमोर हा प्रकार घडला. नवरात्र उत्सव सुरू असल्याने मंदिरासमोर कचरा टाकू नये, असे दीपक रामचंद्र वर्मा यांनी सांगितले. याचा राग आल्याने रुपेश राखेचा व त्याचा भाऊ राहुल राखेचा यांनी वर्मा यांना झाडूच्या दांड्याने डोक्यात मारहाण केली. तसेच हातावर विटेने मारून दुखापत केली आणि त्यांना विटांच्या ढिगाऱ्यावर ढकलून दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यावेळी शिवीगाळ करून जीवे मारण्याची तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिल्याचा ही आरोप आहे.याप्रकरणी १७ ऑक्टोबर २०२६ रोजी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९१९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गवळी करीत आहेत.

# अवैध माती वाहतुकीने रस्त्यांची चाळण!

## ओव्हरलोड हायवा-डंपरची दिवसरात्र वाहतूक; रांजणगाव सांडस-नागरगाव फाटा रस्त्यावर मोठमोठे खड्डे

■ शिरूर (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील विविध गावांमधून कथितरीत्या अवैध माती उपसा करून शिरूर तालुक्यातील रांजणगाव सांडस परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या माती वाहतुकीसाठी दररोज मोठ्या संख्येने ओव्हरलोड हायवा व डंपर धावत असल्याने रांजणगाव सांडस ते नागरगाव फाटा या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

दौंड तालुक्यातील वाळकी व पिराचीवाडी परिसरातील शेतजमिनींमधून जेसीबीच्या सहाय्याने माती उपसा केला जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या मातीची रॉयल्टी पावती नसतानाही दररोज सुमारे ५० ते ६० हायवांमधून रांजणगाव सांडस परिसरात वाहतूक होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे रस्त्याची अवस्था खराब होण्याबरोबरच परिसरात दिवसभर धुळीचे लोट उठत आहेत.

रांजणगाव सांडस येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्य चौकात असल्याने माती वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहे. शाळेच्या परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत संबंधित विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

ओव्हरलोड वाहनांमधून रस्त्यावर माती सांडत असल्याने दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता धोकादायक बनला आहे. दोन दिवसांपूर्वी मातीवरून दुचाकी घसरून एक वाहनचालक किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली. अशा प्रकारच्या घटना यापूर्वीही घडल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. त्यातच रस्त्याच्या साईटपट्ट्यांचीही दुरवस्था झाल्याने समोरून येणाऱ्या वाहनांना बाजू देताना वाहनचालकांची मोठी कसरत होत आहे. ओव्हरलोड हायवा व डंपरचा वेग आणि अरुंद झालेला रस्ता यामुळे ओव्हरटेक करताना अपघाताचा धोका वाढला आहे.

दौंड तालुक्यात सुरू असलेल्या माती उपशाचा परिणाम मात्र शिरूर तालुक्यातील नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे दौंड-शिरूर तालुक्यांच्या सीमेवर महसूल विभागाने संयुक्त पथक नियुक्त करून माती उपसा, वाहतूक तसेच रॉयल्टीच्या बाबतीत तपासणी करावी आणि नियमबाह्य वाहतुकीवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी योगेश रणदिवे यांनी केली आहे.

दरम्यान, सततच्या माती वाहतुकीमुळे खराब झालेला रस्ता संबंधित ठेकेदारांकडून तातडीने दुरुस्त करून घ्यावा, तसेच भविष्यात रस्त्याची अशी अवस्था होणार नाही यासाठी ओव्हरलोड वाहतुकीवर नियंत्रण आणावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



# जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांचा तुटवडा!

## ९ पैकी २ पदवीधर शिक्षक पदे रिक्त; जूनपासून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती




■ शिरूर (दै. संध्या)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मुख्य आधार असलेल्या जिल्हा परिषद शाळेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना निमोणे येथील ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. निमोणे येथील जिल्हा परिषद शाळेत पदवीधर शिक्षकांच्या एकूण नऊ पदांपैकी दोन पदे रिक्त असल्याची माहिती असून, जून महिन्यापासून शिक्षकांची कमतरता जाणवत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत पालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

शाळेत शिक्षकांची आवश्यकता असताना उपलब्ध मनुष्यबळाच्या कार्यभाराबाबतही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला आहे. निमोणे परिसरातील वाड्या-वस्त्यांवरील कागदपत्रे व इतर कामांसाठी काही शिक्षक कार्यरत असल्याचे सांगितले जात असले, तरी संबंधित शिक्षक प्रत्यक्षात अन्य शाळांमध्ये काम करत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकांची नियुक्ती, प्रत्यक्ष उपस्थिती, कार्यभार आणि वेतनाबाबतची वस्तुस्थिती शिक्षण विभागाने तपासावी, अशी मागणी होत आहे. शिक्षकांची कमतरता ही केवळ प्रशासकीय बाब नसून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ शकतो. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद शाळा ही शिक्षणाची महत्त्वाची आणि विश्वासाची संस्था आहे. त्यामुळे शिक्षकांच्या रिक्त जागा दीर्घकाळ रिक्त राहिल्यास शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.निमोणे जिल्हा परिषद शाळेचा शैक्षणिक दर्जा कायम राहावा, विद्यार्थ्यांना पुरेसे शिक्षक उपलब्ध व्हावेत आणि पालकांचा शाळेवरील विश्वास अबाधित राहावा, यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. रिक्त पदांवर शिक्षकांची नियुक्ती करण्याबरोबरच उपलब्ध शिक्षकांचा नियमानुसार योग्य ठिकाणी वापर होत आहे की नाही, याचीही तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

शाळा ही गावाच्या भवितव्याची पायाभरणी करणारी संस्था आहे. त्यामुळे निमोणे शाळेतील परिस्थितीचा गांभीर्याने आढावा घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची जबाबदारी संबंधित प्रशासनाने घ्यावी, अशी अपेक्षा पालक व ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.या प्रकरणी संबंधित शिक्षक आणि शिक्षण विभागाची अधिकृत भूमिका समोर आल्यानंतरच उपस्थित केलेल्या प्रश्नांची संपूर्ण वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

# ओतूरच्या वैभव अस्वार लिखित भैरव पुस्तकाचे प्रकाशन

■ नारायणगाव (दै. संध्या)

ओतूर येथील कुस्तीक्षेत्रात नावलौकिक असणाऱ्या आणि बिबट प्राणी अभ्यासक म्हणून जुन्नर तालुक्यात प्रसिद्ध असलेल्या वैभव अस्वार लिखित, बिबट्यांच्या जीवन संघर्षावर आधारित भैरव या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उपवनसंरक्षक वनविभाग जुन्नर येथे नुकताच पार पडला.

बिबट्यांचा माणसांवर होणाऱ्या हल्ल्यासाठी जुन्नरचा परिसर संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. बिबटे मानवी वस्तीमध्ये शिरकाव का करतात? नेमके हल्ले कधी होतात? का होतात? आणि बिबट्याला हल्ले करण्यापासून कसे थांबवता येऊ शकते? किंवा स्वतःचे संरक्षण कसे करायचे? कोणत्या वेळी,कोणत्या रस्त्याने एकट्याने जाऊ नये.किंवा बिबट्यांच्या माणसांवर हल्ले करण्याच्या वेळा कोणत्या आहेत. इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम रात्री अपरात्री, एकट्याने प्रसंगी टीम घेऊन वैभव अस्वार यांनी जुन्नर तालुक्याच्या परिसरामध्ये अनेक वर्षांपासून करत आहेत. यावेळी आलेले अनुभव त्यांनी या पुस्तकाच्या माध्यमातुन समाजाला सांगितले आहे. या दरम्यान भैरव पुस्तकाचे प्रकाशन प्रशांत खाडे (उपवन संरक्षक वनविभाग अधिकारी ,जुन्नर ) यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी स्मिता राजहंस (डी एफ ओ, बिबट निवारा केंद्र, माणिकडोह) डॉ.महेंद्र ढोरे (माणिकडोह बिबट निवारा केंद्र) संजय भोईटे, यश मस्करे (अध्यक्ष, जुन्नर पर्यटन विकास संस्था) रणजित पवार (प्रकाशक, लेण्याद्री प्रकाशन), किशोर शेलार (प्राणी मित्र, ओतूर), सालिम खान (सॉफ्टवेअर इंजि.जुन्नर), निरज लोखंडे, विराज अस्वार, स्वरांजलि भंडारी, दिनेश भंडारी, जनाबाई अस्वार, संतोष अस्वार उपस्थित होते.



# फुलाप्रमाणे माणसाने देत रहावे : डॉ. रतिलाल बाबेल यांचे मत

■ नारायणगाव (दै. संध्या)

आनंदी राहण्यासाठी कुणाचा द्वेष करू नका, इतरांना मदत करा. आई-वडिलांचा आशीर्वाद सर्वात श्रेष्ठ आहे. अपयशाला घाबरू नका. फुल जन्माला येते, रंग, गंध व मकरंद देते. फुलाप्रमाणे माणसाने देत रहावे असे विचार विज्ञान प्रसारक व स्वामी विवेकानंद पुस्तक भेट योजनेचे मुख्य प्रवर्तक डॉ. रतिलाल बाबेल यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खामुंडी या ठिकाणी मांडले.




वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद पुस्तक भेट योजनेच्या वतीने पाचव्या टप्प्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खामुंडी, न्यू इंग्लिश स्कूल खामुंडी, मॉडेल स्कूल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंब्रज नंबर1, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा काळवाडी या शाळांना मोफत पुस्तके भेट देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. रतिलाल बाबेल हे बोलत होते. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुहास नलावडे, उपाध्यक्ष कैलास बोडके, सदस्य दशरथ जगताप, अक्षया शिंगोटे, नेहा गायकवाड, माशेलकर स्वरूप स्पेस आणि इनोवेशन सेंटर चे उपाध्यक्ष डॉ. तानाजी वामन,मुख्याध्यापक बी.के. बांगर, शैलेंद्र देवगुणे, मुख्याध्यापिका संगीता वामन, मुख्याध्यापिका सविता हिरे, एस. एस. नांगरे मॅडम, एस.बी.आहेर, दिपाली डुंबरे, सुखदेव पथवे, शोभा खर्गे, चंद्रशेखर पवार, मधुकर गायकवाड, सीमा जाधव व चार शाळांमधील जवळपास 370 विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. रतिलाल बाबेल पुढे म्हणाले की, ज्याला आई-वडील सांभाळता येतात त्याला विद्यापीठ सांभाळता येते. भारताचे मिसाईल मॅन डॉ. अब्दुल कलाम म्हणाले होते की, माझ्या समाधीवर फुल वाहण्यापेक्षा एखाद्या गरजू विद्यार्थ्यांना पुस्तक भेट द्या. स्वामी विवेकानंद पुस्तक भेट योजना हेच काम करीत असून खऱ्या अर्थाने वाचन प्रेरणा दिन साजरा करित आहे.

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, नेपोलियन बोनापार्ट, रूजवेल्ट, वॉरन बफे, बिल गेट यांचा वाचन वेग खूप चांगला होता. अमेरिकेतील किम पीक यांचा वाचन वेग मिनिटाला दहा हजार शब्द इतका होता. 23 हजार कोटीच्या मालकीण असणाऱ्या ओप्रा विनफ्रे म्हणतात, ज्याच्याकडे पुस्तके आहेत तो कधीच गरीब नसतो. विद्यार्थ्यांनी वाचन वेग वाढण्याचा प्रयत्न करावा. वाचन वेग कसा वाढविता येईल याबाबत डॉ. रतिलाल बाबुल यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. तानाजी वामन, आहेर सर, देवगुणे सर यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. स्वामी विवेकानंद पुस्तक भेट योजनेच्या पाचव्या टप्प्यासाठी परविन इनामदार मॅडम ( बल्लाळवाडी), प्रा. एल. एन. थोरात सर ( जुन्नर), शंकर केंगले सर (मंचर ), रतिलाल बाबेल (धोलवड ) यांनी आर्थिक योगदान दिले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना डॉ.बाबेल व डॉ. वामन यांनी अनेक वैज्ञानिक प्रयोग करून दाखविले व त्यामागचे वैज्ञानिक कारण समजून सांगितले. बरोबर उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणारे पुस्तक भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर गायकवाड यांनी केले. उपस्थितांचे आभार मुख्याध्यापिका संगीता वामन यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अध्यक्षपदी शिवाजीराव क्षीरसागर व माधुरी क्षीरसागर दांपत्याची निवड

**माळेगाव : दैनिक संध्या**

पांचाळ सोनार समाज महामंडळ बारामती तालुका अध्यक्षपदी शिवाजीराव क्षीरसागर व माधुरी क्षीरसागर या दांपत्याची निवड झाल्याबद्दल पत्रकार बांधव व नागरिकांनी त्यांचा सत्कार केला. पांचाळ सोनार समाज महामंडळ हि सोनार समाजाची महत्वाची संस्था मानली जाते.या संस्थेच्या इतिहासात प्रथमच पतीपत्नीला अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.श्री.शिवाजी क्षीरसागर व माधुरी क्षीरसागर यांनी सोनार समाजासाठी मोलाचं योगदान दिले आहे.या निवडीबद्दल बारामती तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश भोसले,दैनिक प्रभातचे प्रतिनिधी प्रणव तावरे, दैनिक घणाघात संपादिका अनिता तांबे,रिपाईचे तालुका युवकाध्यक्ष विश्वास भोसले,सामाजिक कार्यकर्ते परशुराम आडके यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.या सन्मानाबद्दल क्षीरसागर दांपत्याने पत्रकार व नागरिकांचे आभार मानले.

### अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस सोलापूर जिल्ह्यातून अटक

**वडगाव निंबाळकर : दैनिक संध्या**

वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यात गुन्हा दाखल झाल्यापासून फरार असलेल्या गणेश रामदास मदने (रा.कोऱ्हाळे खुर्द,ता.बारामती,जि.पुणे) यास वडगाव निंबाळकर पोलिसांनी सापळा रचून मोठ्या शिताफीने धर्मपुरी,ता.माळशिरस,जि.सोलापूर येथून ताब्यात घेतले आहे. सदर आरोपीविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २१७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ६४(२)(m), ३५१(२), ३५१(३), ११५(२) तसेच पोक्सो कायदा कलम ४, ५(l), ६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील फिर्यादी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही आरोपीने तिला लग्नाचे खोटे आमिष दाखवून वेळोवेळी तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच फिर्यादीचे फोटो व्हायरल करण्याची व तिला जीवे मारण्याची धमकी देऊन लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची फिर्याद आहे.सदर गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होता. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी वडगाव निंबाळकर पोलिसांकडून प्रयत्न सुरू होते.दरम्यान,आरोपी धर्मपुरी,ता.माळशिरस,जि.सोलापूर येथे लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचून त्यास मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.या कारवाईमुळे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. सदरची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अझर मुलाणी,स.फौ.पन्हाळे,पोलीस हवालदार अनिल खेडकर, कल्याण खांडेकर,भागवत पाटील, सागर चौधरी,भाऊसाहेब मारकड, शशिकांत दळवी,अशोक शिंदे, संदीप गायकवाड तसेच पोलीस शिपाई आबा जाधव,नरेंद्र यादव, सुरज धोत्रे,सचिन घाडगे,सुरज पवार,नागनाथ परगे व विकास येटाळे यांनी केली आहे.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मुलाणी हे करत आहेत.

### बारामती तालुक्यातील कानाडवाडी-पांढरवस्तीच्या पाण्यासाठी पिसाळांचा एल्गार!

**वडगाव निंबाळकर : दैनिक संध्या**

बारामती तालुक्यातील चोपडज ग्रामपंचायत हद्दीतील कानाडवाडी व पांढरवस्ती येथील नागरिकांना गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.पिण्याच्या पाण्यासाठी महिला,ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह सर्वसामान्य कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागत असून,या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे,अशी मागणी बहुजन समाज पार्टीचे बारामती विधानसभा अध्यक्ष दयानंद मोतीराम पिसाळ यांनी केली आहे. यासंदर्भात पिसाळ यांनी पंचायत समिती,बारामती येथील गटविकास अधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले आहे.कानाडवाडी व पांढरवस्ती येथील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची समस्या तातडीने सोडवून कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी. कानाडवाडी व पांढरवस्ती येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे.महिला,ज्येष्ठ नागरिक,लहान मुले तसेच सर्वसामान्य कुटुंबांना पाण्यासाठी कष्ट घ्यावे लागत आहेत.ग्रामपंचायत प्रशासनाकडे या समस्येबाबत वेळोवेळी तोंडी तसेच लेखी स्वरूपात पाठपुरावा करण्यात आला.मात्र अद्यापही या गंभीर प्रश्नावर ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नाही. पिण्याचे पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असताना नागरिकांना इतक्या दिवसांपासून पाण्यासाठी त्रास सहन करावा लागणे ही गंभीर बाब आहे.प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे पिसाळ यांनी म्हटले आहे. सदर निवेदन प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कानाडवाडी व पांढरवस्ती येथील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था करून ठोस कार्यवाही करावी,अशी मागणी करण्यात आली आहे.अन्यथा प्रशासनाच्या निष्क्रियतेच्या निषेधार्थ ग्रामस्थांना सोबत घेऊन पंचायत समिती,बारामती कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन छेडण्यात येईल,असा इशाराही दयानंद पिसाळ यांनी दिला आहे.

### मुंबई उपनगर समाज कल्याण सहाय्यक आयुक्त पाटील यांचा कृतज्ञता सन्मान

**मुंबई : दैनिक संध्या**

समाज कल्याण विभागाच्या स्थापना दिनानिमित्त मुंबई उपनगर मध्ये विशेष गौरव उपक्रम राबविण्यात आला. नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई उपनगर जिल्हा संघटक दिशा कळंबे यांनी समाज कल्याण विभाग मुंबई उपनगर सहाय्यक आयुक्त रविकिरण पाटील यांना कृतज्ञता सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. व्यसनमुक्त व समता समाज निर्मितीच्या चळवळीला नवी दिशा मिळाली समाज कल्याण विभाग व नशाबंदी मंडळ यांचे समाजहिताचे कार्य अधिक बळकट व्हावे. या उद्देशाने या विशेष उपक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. याप्रसंगी दिशा कळंबे यांनी मुंबई उपनगर समाज कल्याण कार्यकारी अधीक्षक सविता म्हात्रे आणि समाज कल्याण अधिकारी माधुरी सौदागरे यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.समाज कल्याण विभागाचे कार्य म्हणजे केवळ शासकीय सेवा राबविले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोचवण्याचा आशेचा किरण निर्माण करणे आहे अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# पुणे लोकमान्य फेस्टिवलमध्ये 'महिला दांडिया' संपन्न

■ पुणे : (दै. संध्या)

नवरात्रीचा उत्साह, गरब्याचा ताल आणि दांडियाच्या ठेक्यावर थिरकणाऱ्या महिलांचा उत्स्फूर्त सहभाग अशा आनंददायी वातावरणात पुणे लोकमान्य फेस्टिवलअंतर्गत आयोजित 'रास रिदम गरबा नाईट' हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. गंमत जंमत इव्हेंट्स निर्मित आणि चैताली माजगावकर-भंडारी प्रस्तुत या कार्यक्रमाला महिलांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

महिलांसाठी विशेष आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात लाईव्ह दांडिया ऑर्केस्ट्राने विशेष रंगत आणली. संगीताच्या तालावर महिलांनी गरबा आणि दांडियाचा मनमुराद आनंद घेतला. उत्सवी वातावरण, दांडियाचा नाद आणि नृत्याचा उत्साह यामुळे संपूर्ण कार्यक्रमस्थळी चैतन्य निर्माण झाले होते.

नवरात्रीच्या पारंपरिक संस्कृतीचे जतन करत महिलांना एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी या कार्यक्रमातून मिळाली. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांनी दांडियाच्या तालावर ठेका धरत कार्यक्रमाची रंगत वाढवली. लाईव्ह ऑर्केस्ट्राच्या संगीताने उपस्थितांचा उत्साह अधिकच वाढला. मनोरंजनासोबतच महिला सहभाग आणि सांस्कृतिक एकतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम उपस्थितांसाठी आनंददायी ठरला. गंमत जंमत इव्हेंट्सच्या निर्मितीतून आणि चैताली माजगावकर-भंडारी यांच्या प्रस्तुततेतून साकारलेल्या 'रास रिदम गरबा नाईट'ने पुणे लोकमान्य फेस्टिवलच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विशेष रंगत आणली. महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि जल्लोषपूर्ण वातावरणामुळे हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. या कार्यक्रमाची माहिती पुणे लोकमान्य फेस्टिवलचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते यांनी दिली.



# आत्मनिर्भर भारतासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता

■ पुणे : (दै. संध्या)



उद्योगविश्वात आजही कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. शिक्षण आणि प्रत्यक्ष काम करणारे मनुष्यबळ तयार करणे ही आताची गरज आहे. त्याच दृष्टीने शिक्षण प्रसारक मंडळी प्रयत्नशील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत आत्मनिर्भर व्हावा यासाठी गेल्या काही वर्षात बरेच प्रयत्न केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शि. प्र. मंडळीच्या वेलिंगकर इन्स्टीट्यूटची तिसरी शाखा पुण्यात पुढील वर्षी सुरू करत असल्याचे नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर यांनी सांगितले. भारतामध्ये जगाला विश्वगुरू म्हणून मार्गदर्शन करण्याची क्षमता असल्याचे त्यांनी नमूद केले.

शि. प्र. मंडळीच्या प्रिन्सिपल एल. एन. वेलिंगकर इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च (वी-स्कूल) यांच्या वतीने माजी विद्यार्थी आणि कॉर्पोरेट मेळाव्याचे आयोजन सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मैदानावरील ज्ञानमंडपम येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर नियामक मंडळाचे उपाध्यक्ष राधेशाम अग्रवाल, सचिव रमा कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सुनील जोशी आदी उपस्थित होते.

सुधीर काळकर म्हणाले, "येत्या काळात जिओपॉलिटीकल, तांत्रिक, देशांच्या सीमेबाबत अशी विविध प्रकारची आव्हाने वाढणार आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि देश सक्षम बनविण्यासाठी उत्तम मनुष्यबळाची निर्मिती करणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना केवळ अभ्यास शिकवून उपयोग नाही, तर त्यांना अडचणींचा सामना कसा करायचा, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उत्तम संवाद कौशल्ये, आपल्या मुळांना धरुन राहण्याची मूल्ये यांसारख्या गोष्टी शिकवायला हव्यात. शिक्षण हे एकमेव असे क्षेत्र आहे जिथे स्पर्धा नाही. त्यामुळे या माध्यमातून उत्तम विद्यार्थी घडवणे हेच शिक्षण प्रसारक मंडळीचे ध्येय आहे. देशाच्या विकासात योगदान देऊ शकणाऱ्या कुशल व्यवस्थापकांना घडविण्याचे काम वेलींकर इन्स्टिट्यूट करत आहे."

सुनील जोशी यांनी वी-स्कूलचा इतिहास, परंपरा सांगतानाच संस्था म्हणून मोठे होण्यासाठी किंवा वाढण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते ते सांगितले. पुण्यात पुढील वर्षी सुरू होणारे वेलिंगकर इन्स्टीट्यूटचे देशातील तिसरी शाखा असल्याचेही त्यांनी नमूद केले. मुंबईतील माटुंगा, बेंगलोर आणि आता पुण्यासारख्या शहरात वेलिंगकरचा विस्तार करताना आम्हाला आनंद होत असल्याचे ते म्हणाले.

## राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा पुढाकार

■ नागपूर : (दै. संध्या)

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथे बालस्नेही वातावरण निर्माण केले जाणार आहे. यामध्ये बालकांसाठी स्वतंत्र खेळण्याची व बसण्याची जागा, समुपदेशनाची सुविधा, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि बालकांना सहज वापरता येतील अशा भौतिक सुविधांचा समावेश असेल. पॉक्सो कायद्यांतर्गत येणाऱ्या प्रकरणांमध्ये बालकांची आरोग्य तपासणी आहे. 'सुरक्षित बालपण, सुरक्षित समाज' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी हा पुढाकार घेण्यात आला आहे. बाल हक्कांचे संरक्षण आणि समाजातील विविध घटकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोगाच्या सदस्या गीतांजली बुटी यांच्या अध्यक्षतेखाली नागपुरात बैठक झाली.

## भावी शिक्षकांसाठी 'ज्ञानसंजीवनी'!

■ अरण्येश्वर : (दै. संध्या)



पुणे येथील अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) आणि नवीन सीबीसीएस (CBCS) अभ्यासक्रमावर आधारित एम.एड. (M.Ed.) व बी.एड. (B.Ed.) च्या सुधारित अभ्यासक्रमांवरील पाच महत्त्वपूर्ण संदर्भ पुस्तकांचे प्रकाशन अत्यंत उत्साहात पार पडले. शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य 'निराली प्रकाशन'तर्फे ही सर्व पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी . जी. चौगुले यांच्या शुभहस्ते या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. B.Ed. आणि M.Ed. च्या सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी तसेच भावी अध्यापकांसाठी ही पुस्तके अभ्यासाच्या दृष्टीने सोपी, मार्गदर्शनपर आणि अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. *महाराष्ट्राचे लाडके नेतृत्व आणि प्रेरणास्थान श्री. अजितदादा पवार यांच्या पावन स्मृतीस अर्पण शिक्षणाचा ध्यास आणि सामाजिक बांधिलकी जपत, ही सर्व पाच संदर्भ पुस्तके महाराष्ट्राचे आदरणीय माजी उपमुख्यमंत्री *श्री. अजितदादा पवार* यांच्या पवित्र आणि पावन स्मृतीस अत्यंत आदराने व सप्रेम समर्पित करण्यात आली आहेत. या उत्कृष्ट आणि वेळेची गरज असलेल्या संदर्भ ग्रंथांच्या लेखनाबद्दल लेखिका डॉ. शुभांगी सूर्यकांत कुऱ्हाडे, प्रा. प्राजक्ता गुलाबराव खटाटे आणि डॉ. कविता प्रदिप तोटे यांचे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातून विशेष कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

## श्री निलकंठेश्वर विद्यालयात महाभोंडला संपन्न



■ वालचंदनगर : (दै. संध्या)


रयत शिक्षण संस्थेच्या श्री निलकंठेश्वर विद्यालय, लासुर्णे (ता. इंदापूर) येथे नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून शनिवारी १७ ऑक्टोबर रोजी महाभोंडला २०२६-२७ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी पारंपरिक भोंडल्यात सहभागी होत मराठी संस्कृती व परंपरेचे दर्शन घडविले.

कार्यक्रमादरम्यान भोंडल्याची गाणी, खिरापत आणि विविध मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या परंपरांची ओळख होते.

तसेच त्यांच्यात सांघिक भावना, आनंद आणि सांस्कृतिक जाणीव वाढीस लागते. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे प्राचार्य श्री ओमासे सर, पर्यवेक्षिका सौ. शेख मॅडम, श्री जाधव पी. बी. सर, सौ. मोरे मॅडम, श्री रासकर सर, श्री सादरे सर, श्री शेलार सर आणि श्री जाधव एस. एम. सर यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ आणि विशेष करून महिलांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला.

# ज्येष्ठ साहित्यिक शरद अत्रे यांची तीन पुस्तके प्रकाशित

■ पुणे (दै. संध्या)




ज्येष्ठ कवी-लेखक शरद गणेश अत्रे यांच्या 'स्पर्श'(कवितासंग्रह),'शरदाचं चांदणं'(लेखसंग्रह) आणि 'प्राजक्त फुले'(कथासंग्रह)या तीन पुस्तकांचे प्रकाशन आज मोरेश्वर सभागृह,सिंहगड रोड,पुणे येथे ज्येष्ठ उद्योजक व रोटरी इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल अरुण कुदळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या प्रकाशनाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सूर्यकांत वैद्य, निवृत्त प्राचार्य ,सौ शीला अत्रे,सुहास शाळीग्राम,परमेश्वर उमरदंड,डॉ अरविंद नेरकर,गायिका चारुशीला बेलसरे उपस्थित होते.

कवी व लेखकाचे मनोगत व्यक्त करताना शरद अत्रे म्हणाले "कविता ही माझ्यासाठी 'स्वान्तसुखाय' आनंदाचा आविष्कार आहे.गेली ४५ वर्षांहून अधिक काळ मी साहित्य लेखनाचा छंद जपला आहे. निसर्ग,अध्यात्म आणि सकारात्मक विचार हे माझ्या लेखनाचे जिव्हाळ्याचे विषय आहेत. वाचकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि पुरस्कार ही माझ्यासाठी प्रेरणादायी शिदोरी आहे. आपल्या लेखणीतून आनंद आणि सकारात्मकता वाचकांपर्यंत पोहोचवणे हेच माझ्या साहित्य लेखनाचे खरे ध्येय आहे."

ज्येष्ठ साहित्य अभ्यासक सूर्यकान्त द. वैद्य म्हणाले,"शरद अत्रे हे जीवनक्षणांत भावरंगांचे इंद्रधनू रेखाटणारे कवी आहेत.निसर्गसौंदर्य,मानवी संवेदना आणि जीवनातील सूक्ष्म अनुभव यांचे प्रत्ययकारी दर्शन त्यांच्या कविता,लेख आणि कथांमधून घडते.साधी-सुबोध भाषा,मोजके शब्द आणि आशयाची खोली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत.साहित्याने केवळ बुद्धीचा विकास न होता भावविश्व समृद्ध करून समाजात भावनिक ऐक्य निर्माण करणेही महत्त्वाचे आहे." वयाच्या ऐंशीच्या आसपासही त्यांचा लेखनउत्साह कायम असून, त्यांनी कादंबरी लेखनाकडेही वळावे, अशी अपेक्षा वैद्य यांनी व्यक्त केली


अरुण कुदळे म्हणाले, "आयकर विभागातील कामाच्या व्यापात त्यांनी अनुभवलेले मानवी स्वभावाचे विविध पैलू त्यांच्या 'स्पर्श', 'शरदाचं चांदणं' आणि 'प्राजक्त फुले' या तीन पुस्तकांतून व्यक्त झाले आहेत. 'स्पर्श' या कविता संग्रहातून मानवी संवेदनांचा प्रत्यय येतो,तर 'शरदाचं चांदणं' या ललितलेखांतून निवृत्ती नंतरच्या प्रसन्न जीवनाचे दर्शन घडते.'प्राजक्त फुले' या कथासंग्रहात विविध माणसांचे स्वभावचित्रण आहे.शरद अत्रे यांनी लवकरच पुस्तकांचे शतक पूर्ण करावे," अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या वेळी सुहास शाळीग्राम,डॉ अरविंद नेरकर यांनी मनोगते व्यक्त केली.रेवती जोशी यांनी सरस्वती वंदना व पसायदान सादर केले.अभिजित आणि अमित अत्रे यांनी पाहुण्यांचा परीचय करून दिला.प्राजक्ता अत्रे यांनी सूत्रसंचालन तर प्रज्ञा अत्रे यांनी आभार प्रदर्शन केले .



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६



www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



## थोडक्यात पण महत्वाचे




### आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषदेत स्त्रीशक्ती, नेतृत्व अन् मानसिक स्वास्थ्यावर मंथन

**पिंपरी : दैनिक संध्या**

बौद्ध धम्मातील प्रज्ञा, करुणा, सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या मूल्यांना अधोरेखित करत महिला नेतृत्व, ऐतिहासिक योगदान, जागतिक भिक्खुनी परंपरा आणि मानसिक स्वास्थ्य अशा विविध विषयांवर चिंचवड येथे शनिवारी (दि. १७) आयोजित आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषदेत विचारमंथन करण्यात आले. डॉ. उज्ज्वला अंदुरकर, डॉ. संध्या हरिभक्त, डॉ. वैशाली भामरे, लक्ष्मीकांता माने यांनी या परिषदेचे आयोजन केले होते. विस्डम इन मोशन, कॅटलिस्ट फाउंडेशन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ही परिषद पार पडली. या परिषदेत ज्ञानातून नेतृत्व, संवादातून समाजनिर्मिती करण्याच्या तसेच बौद्ध मूल्ये समाजात रुजवण्याविषयी चर्चा करण्यात आली. परिषदेला सुमारे एक हजार उपासक-उपासिकांनी उपस्थिती लावली. देश-विदेशांतील बौद्ध भिक्खुनी, अभ्यासक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्त्या आणि विविध क्षेत्रांतील महिलांनी परिषदेत सहभाग घेतला. बुद्ध अँथमवरील नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर व्हिएतनामी बौद्ध परंपरेतील मंत्रोच्चार सादर करण्यात आले. परिषदेच्या प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. विमल थोरात यांनी बुद्धांचा आणि आंबेडकरी विचार पुढे चालू ठेवण्यासाठी यापुढे जेन झी पिढीने पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन केले. त्याचबरोबर बाबासाहेबांच्या शिक्षित बना या आवाहनाला महिलांनी गांभीर्याने घेतले असून नवी 'शिक्षित पिढी' घडवण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असल्याचे मत व्यक्त केले. विशेष अतिथी, मिलिंद महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान यांनी, बोधगया महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याची तसेच स्वतंत्र पाली विद्यापीठ महाराष्ट्रात स्थापन करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेण्याची मागणी केली. त्याचबरोबर पुढची परिषद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयात घेण्याचे निमंत्रण दिले. प्रा. मनोरी पी. सेनानायके यांनी 'बौद्ध मूल्ये : सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्व' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी बहुजन हिताय, बहुजन सुखाय या मूल्यांवर आधारित असणारा बुद्धिजम एक आदर्श जीवनमार्ग असल्याने ही मूल्ये समाजात रुजवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे मत व्यक्त केले. यावेळी भिक्खुनी महाकासा यांनी कोरियन भिक्खुनी संघाची जागतिक स्तरावरील प्रेरणादायी भूमिका या विषयावर व्हिडिओद्वारे विचार मांडले.

### दुष्काळात होरपळणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांसाठी शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी

**यवत : दैनिक संध्या**

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांना दिवाळी सणासाठी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर झाल्याची चर्चा सुरू असताना, दुसरीकडे शेतमजूर, कष्टकरी कामगार आणि भूमिहीन शेतकऱ्यांना या मदतीत स्थान मिळणार की नाही, असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या या घटकांच्या दिवाळीचा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून स्वतंत्र आर्थिक मदत जाहीर होणार का, याकडे ग्रामीण भागातील कष्टकरी नागरिकांचे लक्ष लागले आहे. दुष्काळामुळे शेतीचे नुकसान झाले की त्याचा परिणाम केवळ जमीनमालक शेतकऱ्यांवरच होत नाही, तर शेतात दिवसभर कष्ट करणाऱ्या मजुरांवरही होतो. पावसाअभावी पिके कमी आली, शेतीची कामे घटली किंवा शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले की शेतमजुरांच्या हाताला काम मिळणेही कठीण होते. परिणामी, रोजच्या मजुरीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या हजारो कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे राहते. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याचा निर्णय महत्त्वाचा असला, तरी शेतीच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेत योगदान देणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांचा विचार होणेही तितकेच आवश्यक आहे. शेतात पेरणी, निंदणी, खुरपणी, कापणी आणि इतर कामांसाठी मजूर दिवसभर राबतात. मात्र, त्यांच्या नावावर शेतीची जमीन नसल्याने जमीनधारक शेतकऱ्यांसाठी असलेल्या अनेक मदत योजनांचा लाभ त्यांना मिळत नाही. शेतीचे नुकसान झाले की शेतमजुरांचे रोजगाराचे दिवस कमी होतात. काही कुटुंबांना कामाच्या शोधात गाव सोडून दुसरीकडे जावे लागते. अशा परिस्थितीत दिवाळीसारख्या सणासाठी कपडे, किराणा, फराळ, मुलांचे शैक्षणिक खर्च आणि घरातील इतर गरजा भागविणे त्यांच्यासाठी मोठे आव्हान ठरते. ज्यांच्या श्रमांवर शेती उभी आहे, त्या भूमिहीन कष्टकऱ्यांच्या सणाचा विचार शासनाने करायचा की नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. ग्रामीण भागात अनेक कुटुंबे अल्पभूधारक शेतकरी, बटाईदार, शेतमजूर किंवा भूमिहीन कामगार म्हणून जीवन जगतात. काही कुटुंबांकडे स्वतःच्या नावावर शेती नसली, तरी त्यांचा उदरनिर्वाह पूर्णपणे शेतीतील कामांवर अवलंबून असतो. दुष्काळाचा परिणाम या सर्व घटकांवर होत असताना मदतीचे निकष ठरविताना केवळ जमीनधारणा नव्हे, तर प्रत्यक्ष आर्थिक परिस्थिती, रोजगाराचे स्वरूप आणि कुटुंबाची उपजीविका यांचाही विचार होणे गरजेचे आहे.

### साहित्यिक शरद अत्रे यांची तीन पुस्तके प्रकाशित

**पुणे : दैनिक संध्या**

ज्येष्ठ कवी-लेखक शरद गणेश अत्रे यांच्या 'स्पर्श'(कवितासंग्रह),'शरदाचं चांदणं'(लेखसंग्रह) आणि 'प्राजक्त फुले'(कथासंग्रह)या तीन पुस्तकांचे प्रकाशन आज मोरेश्वर सभागृह, सिंहगड रोड, पुणे येथे ज्येष्ठ उद्योजक व रोटरी इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल अरुण कुदळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रकाशनाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सूर्यकांत वैद्य, निवृत्त प्राचार्य, सौ शीला अत्रे, सुहास शाळीग्राम,परमेश्वर उमरदंड,डॉ अरविंद नेरकर, गायिका चारुशीला बेलसरे उपस्थित होते. कवी व लेखकाचे मनोगत व्यक्त करताना शरद अत्रे म्हणाले "कविता ही माझ्यासाठी 'स्वान्तसुखाय' आनंदाचा आविष्कार आहे. गेली ४५ वर्षांहून अधिक काळ मी साहित्य लेखनाचा छंद जपला आहे. निसर्ग, अध्यात्म आणि सकारात्मक विचार हे माझ्या लेखनाचे जिव्हाळ्याचे विषय आहेत. वाचकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि पुरस्कार ही माझ्यासाठी प्रेरणादायी शिदोरी आहे.आपल्या लेखणीतून आनंद आणि सकारात्मकता वाचकांपर्यंत पोहोचवणे हेच माझ्या साहित्य लेखनाचे खरे ध्येय आहे."



विद्या विकास एज्युकेशन सोसायटी, विक्रोळी व विकास हायस्कूल शाळा समूहाच्या इमारतीत शारदीय नवरात्र उत्सव सरस्वती पूजन करण्यात आले.याप्रसंगी समूहाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अनघा राऊत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता घोडके, संस्था प्रतिनिधी डॉ. मेघा परब आणि शिक्षकवृंद छायाचित्रात दिसत आहेत.

# नुकसानभरपाई, विम्याची प्रक्रिया होणार सुलभ

■ पुणे : (दै. संध्या)



नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे नुकसान झाल्यानंतर पंचनामे, कागदपत्रांची जुळवाजुळव आणि पात्रतेच्या याद्यांमधील नोंदी यांसाठी शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि माहितीवर आधारित करण्यासाठी पुण्यातील शेअर क्रॉपर्स प्रायव्हेट लिमिटेडने (एससीपीएल) डिजिटल प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांची जमीन, पिके, पेरणी, उत्पादन, खर्च आणि नुकसानीसंबंधी माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे याचा सगळ्यात जास्त फायदा हा नुकसानभरपाई आणि विम्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक पुरावे संकलित करण्यासाठी होणार आहे. शेअर क्रॉपर्सच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत संस्थापिका कृष्णा भट, सुधा ज्योती, संजय खत्री यांनी या उपक्रमाची माहिती दिली.

कृष्णा भट म्हणाल्या, "प्रत्येक नैसर्गिक आपत्तीनंतर शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती गोळा करणे, पंचनामे करणे, कागदपत्रांची पडताळणी आणि पात्र लाभार्थ्यांच्या याद्या तयार करणे, अशा अनेक टप्प्यांतून जावे लागते. अनेकदा शेतकऱ्यांना आपल्या नावाची नोंद झाली आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये बऱ्याच फेऱ्या माराव्या लागतात. पण ही प्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतीविषयक नोंदींचे डिजिटल स्वरूपात एकत्रीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. या प्रणालीमध्ये शेतजमीन, प्लॉट, पेरणी, पीकनिहाय माहिती, बियाणे व खतांची खरेदी, मजुरी, फवारणी, यंत्रसामग्री, सिंचन, उत्पादन, विक्री तसेच नफा-तोटा यांची सोप्या पद्धतीने नोंद ठेवता येणार आहे. त्यामुळे शेतीसंबंधी विविध माहिती आणि कागदपत्रे वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याऐवजी ती एकाच डिजिटल व्यवस्थेत उपलब्ध होतील. या माहितीच्या आधारे शेतीचा खर्च कमी करणे, कर्ज किंवा विम्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि सगळ्यात महत्त्वाचे पीक व्यवस्थापनाबाबत अधिक अचूक निर्णय घेणे शक्य होणार आहे."संजय खत्री म्हणाले, "या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात तीन डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू करण्यात येणार आहेत. यामध्ये 'स्वयंपूर्ण गाव विकास प्रकल्प पोर्टल' हे शेतकरी, शेतकरी मित्र, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), संस्था आणि सेवा भागीदारांना जोडणारे केंद्रीय व्यासपीठ असेल. 'खेत नायक' या मोबाइल ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतीची स्थिती, खर्च, उत्पादन आणि विविध सेवांची माहिती पाहता येईल. तर 'किसान नायक' हे ॲप गावपातळीवर कार्यरत शेतकरी मित्रांसाठी असून, त्याद्वारे शेतकऱ्यांच्या नोंदी तयार करणे, त्यांची पडताळणी करणे आणि आवश्यक छायाचित्रे व कागदपत्रे जोडणे शक्य होणार आहे. या ॲपमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित स्मार्ट इनबॉक्सची सुविधाही असेल. शेतकऱ्यांना रेकॉर्ड ठेवण्याबाबत पुरेशी माहिती नसते, मात्र त्यामुळे त्यांचे अधिक नुकसान होते. या ॲपव्दारे हा पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर पुढील टप्प्यात गावांच्या शाश्वततेसाठी काम केले जाणार आहे. गेल्या काही वर्षात आपल्याकडे शेतकरी आत्महत्त्यांचे प्रमाण वाढले असून ते कमी करण्यासाठी या यंत्रणेचा चांगला उपयोग होईल. यामध्ये शेतकऱ्यांशी संबंधित सर्व गोष्टींचा बारकाईने विचार केला असून शेतकऱ्यांना त्याचा निश्चितच फायदा होणार आहे."या तीनही डिजिटल प्लॅटफॉर्मचे औपचारिक लोकार्पण सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नवी पेठेतील पत्रकार भवन येथे शेतकरी नेते अनिल घनवट यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी 'मशिनरी ऑन फ्युएल कॉस्ट' या उपक्रमांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या (एफपीओ) भागीदारांना पाच ट्रॅक्टर हस्तांतरित करण्यात येणार आहे. स्वतंत्र भारत पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष सीमा नारोडे, वृत्ती ग्रुपचे संस्थापक वीरेंद्र जमदाडे, 'फिनसो'चे संस्थापक दीपक शुक्ला, ऍग्रोवनचे संपादक रमेश जाधव, कृषी व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. यशवंत साळे, राहुल पाटील आदी उपस्थित राहणार आहेत, असे त्यांनी सांगितले.या उपक्रमात शेतकरी मित्र शेतकऱ्यांना नोंदी तयार करण्यापासून आवश्यक माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यापर्यंत मदत करणार आहेत. पिकांचे छायाचित्र, त्याचे स्थान, तारीख, पेरणीची नोंद, पिकाची अवस्था आणि शेतीवरील खर्चाचा इतिहास यांची माहिती एकत्रित ठेवता येईल. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यानंतर त्याची छायाचित्रे आणि संबंधित नोंदी याच डिजिटल संचिकेत जोडल्यास विमा दावा किंवा शासकीय मदतीच्या प्रक्रियेत पूरक पुरावे म्हणून त्यांचा उपयोग होऊ शकतो. शेतकरी, शेतकरी मित्र, एफपीओ, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, विविध संस्था आणि माध्यम प्रतिनिधींना या डिजिटल प्रणालीची माहिती देणे, तसेच शेती व्यवस्थापनात तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे, असेही त्यांनी नमूद केले.

## काळदरीमध्ये भोंडल्यातून जलसंवर्धनाचा संकल्प

■ जेजुरी : (दै. संध्या)



श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित श्री. केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज काळदरी या विद्यालयात नवरात्रोत्सवानिमित्त पारंपरिक भोंडला उत्साहात साजरा करण्यात आला. सांस्कृतिक परंपरेचे जतन करीत विद्यार्थिनींनी पाणी बचतीचा संकल्प केला. पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीत जलसंवर्धनासाठी प्रार्थना करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे विद्यालयाचे वतीने विद्यार्थिनींना महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीची आणि पारंपरिक लोककलेची ओळख करून देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी पुढाकार घेत हत्तीच्या प्रतिकृतीची आकर्षक सजावट करून सुंदर पानाफुलांची रांगोळी साकारली. नटूनथटून आलेल्या विद्यार्थिनी, शिक्षिका आणि माता-पालकांनी पारंपरिक पद्धतीने हत्तीचे पूजन केले. त्यानंतर सर्वांनी एकत्र येत भोंडल्याची विविध लोकगीते गायली.

हस्त नक्षत्रात पावसाचा अभाव जाणवत असल्याने कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई दूर व्हावी आणि जलसंवर्धनाचा मार्ग सुकर व्हावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली.

## श्री केदारेश्वर विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

■ काळदरी : (दै. संध्या)

भारतरत्न, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस शासनाच्या वतीने 'वाचन प्रेरणा दिन'म्हणून साजरा केला जातो. वाचन हे ज्ञानार्जनाचे एक साधन आहे.

तसेच वाचन ही जीवनभर पुरणारी शिदोरी आहे. अशा या वाचनाचे महत्त्व सांगणारा 'वाचन प्रेरणा दिन' श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज काळदरी येथे वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य जन्मदिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने प्रशालेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता १० वी च्या विद्यार्थिनींनी 'माझी मराठी', 'लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी' या कवितांचे काव्य गायन सादर केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी पुस्तकाची मानवी आकृती काढून पुस्तकांचे प्रकट व मूक वाचन केले.

या उपक्रमात विद्यालयातील १७४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. भारतरत्न माजी राष्ट्रपती मिसाइल मॅन, थोर वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व विशद करताना डॉ. कलाम यांच्या 'अग्निपंख' या पुस्तकाची माहिती प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांनी विद्यार्थ्यांना दिली.

## रोटरी क्लब ऑफ पूना डाउनटाउनतर्फे थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिर

■ पुणे : (दै. संध्या)



थॅलेसेमिया या आनुवंशिक रक्तविकाराबाबत जनजागृती करण्यासह त्याचे लवकर निदान व्हावे आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ पूना डाउनटाउन आणि जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ( जेएसपीएम) पुणे विद्यापीठ वाघोली यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या परिसरात जनजागृती व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात १३० जणांची तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या वेळी रोटरी क्लब ऑफ पूना डाउनटाउनच्या अध्यक्षा शिखा मित्रा, सचिव डॉ. प्रसन्ना शिरवेकर ,थॅलेसेमिया सोसायटी पुणे चॅप्टरच्या संस्थापक-अध्यक्षा डॉ. नीता मुन्शी(प्रमुख पाहुण्या), जेएसपीएम विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रवी जोशी, कुलगुरू प्रा. डॉ. राजेंद्र कानफाडे आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अजित थेते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिखा मित्रा म्हणाल्या समाजाच्या आरोग्यविषयक गरजांबाबत जागरूकता निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला चालना देणे, हे रोटरीच्या सामाजिक बांधिलकीचे महत्त्वाचे अंग आहे.

## पुणे फेस्टिव्हलचा पुरस्कार हा जणु माहेरवाशिणीचा गौरव

■ मुंबई : (दै. संध्या)




पुणे फेस्टिव्हलच्या सुरवातीपासून मी या महोत्सवाचा भाग आहे. उद्घाटनापासून ते एकल सादरीकरणापर्यंत, मी या महोत्सवात नृत्यसेवा केली आहे. त्यामुळे मी स्वतःला पुणे फेस्टिव्हल कुटुंबाचा एक घटक मानते. मला दिलेला पुरस्कार मी माहेरवाशिणीचा गौरव म्हणून विनम्रतेने स्वीकारते, असे उद्गार प्रसिद्ध नृत्यगुरू, नृत्यांगना डॉ. स्वाती दैठणकर यांनी शनिवारी येथे काढले.

पुणे फेस्टिव्हलतर्फे 'नृत्य झंकार' ही महिलांची नृत्य स्पर्धा शनिवारी बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी ज्येष्ठ भरतनाट्यम नृत्यांगना व नृत्यगुरू स्वाती दैठणकर यांना पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते पुणे फेस्टिव्हल 'नृत्यगुरू पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, उपरणे आणि पुष्पगुच्छ, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलच्या चेअरपर्सन मीरा सुरेश कलमाडी, मुख्य संयोजक ॲड अभय छाजेड, विश्वस्त मोहन टिल्लू, माजी आमदार दिप्ती चवधरी, नगरसेवक सुनील शिंदे, स्पर्धा संयोजक संयोगिता कुदळे तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून पोलिस निरीक्षक शीतल जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. दैठणकर म्हणाल्या, माझे कलाशिक्षण मुंबईत झाले, पण लग्नानंतर मी पुण्यात आले आणि आमचे सारे कुटुंबच पुणे फेस्टिव्हलचा एक भाग झाले.

# पुणे नवरात्रौ महोत्सवात टाळ्या आणि हास्याने रंगली हास्यमैफल

■ पुणे (दै. संध्या)



घराघरातले दैनंदिन समरप्रसंग, नवरा-बायकोची भांडणे, कोवळ्या वयातली प्रेमभंग प्रकरणे इथपासून ते थेट राजकीय कोपरखळ्या मारणारे लाडकी बहीण, महाविकास आघाड्या, इटलीचे संदर्भ... असे विषयांचे वैविध्य जपणारी हास्यमैफल पुणे नवरात्रौ महोत्सवात शनिवारी सायंकाळी रंगली. हास्यकवींच्या विनोदी ढंगाच्या सादरीकरणाला रसिकांनीही मनमोकळी दाद दिली.

पुणे नवरात्रौ महोत्सवाची सहावी माळ नेहरू स्टेडियम येथील गणेश कला क्रीडा मंदिरात हास्यमैफिलीच्या रूपाने गुंफली गेली. यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील तसेच एकपात्री कलाकार मकरंद टिल्लू आणि पुणे नवरात्रौ महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष आबा बागुल उपस्थित होते. हर्षवर्धन पाटील आणि मकरंद टिल्लू यांच्या हस्ते हास्यकवींचा सत्कार करण्यात आला.

हर्षवर्धन पाटील म्हणाले, मी या महोत्सवाचाच एक घटक आहे. गेल्या ३२ वर्षांत मी २५ वेळा तरी या महोत्सवाला उपस्थिती लावली आहे कारण मी महोत्सवाचाच एक घटक आहे, असे मानतो. महोत्सवाचे आयोजक आबा बागुल यांच्याविषयी ते म्हणाले, समाजात आरंभशूर अनेक असतात. पण आबांनी वेगळेपण आणि सातत्य जपले आहे, हे महत्त्वाचे आहे. आपल्याला लोकशाही मिळाली आहे, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे. पैसा आहे, प्रतिष्ठा, पदे आहेत, पण तरीही आपले हास्य हरवले आहे, असे चित्र दिसते आहे. या पार्श्वभूमीवर ही हास्यमैफल उत्तरोत्तर रंगत जावो आणि हसू फुलवत राहो...

हास्यकवी अनिल दीक्षित, डॉ. दिलीप कुलकर्णी, स्वाती सुरंगळीकर, संदीप अवचट, भालचंद्र कोळपकर आणि बंडा जोशी यांनी आपल्या विनोदी ढंगाच्या कवितांनी या हास्यमैफिलीचे रंग खुलवले. दीक्षित यांच्या 'गुलाबी साडी'ने रसिकांना मनमुराद हसवले आणि नोटाबंदीच्या संदर्भांनी वेगळीच दशकपूर्ती अनुभवली. डॉ. कुलकर्णी यांच्या कवितांनी मूळ प्रसिद्ध गीतांचे संदर्भ जागवले. पहाटे पहाटे मला जाग आली, या सुरेश भट यांच्या कवितेचे विडंबन त्यांनी पहाटे पहाटे मला झोप आली, हिची घोरण्याची क्रिया मंद झाली, अशा शब्दांत ऐकवून हास्यलकेरी उठवल्या. तसेच ग. दि. माडगूळकरांची पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी, या गीताचे विडंबन त्यांनी पोत्याइतुका खिसा पाहिजे, अशा शब्दांत सादर केले. देणाऱ्यांना रोग हजारो, इवली माझी गोळी, असे वास्तवही त्यांनी ऐकवले. स्वाती सुरंगळीकर यांनी 'घरचा आहेर' या कवितेतून वरमाईचा लोभीपणा आणि तिला घरच्यांची घडवलेली अद्दल, असा विषय मांडला. नवऱ्याची चलाखी सांगणारी 'तूच माझी राणी'ही त्यांची कविताही उल्लेखनीय होती. संदीप अवचट यांनी राजकीय संदर्भांवर व्यंगात्मक भाष्य करणारे सादरीकरण केले. भाकर आणि पिझ्झा तसेच लाडकी बहीण, असे विषय त्यांनी विनोदाच्या अवगुंठणातून मांडले. महाविकासात कुठून आणायची निष्ठा, असा प्रश्न विचारणारी त्यांची कविता होती. त्यांनी ऐकवलेली 'मीच म्हणून टिकले बाई तुमच्या या संसारी', ही कविताही घराघरातले चित्र मांडणारी होती. भालचंद्र कोळपकर यांनी सिनेनटीशी लग्न करण्याचा व्यर्थ प्रयत्न करणाऱ्या हीरोच्या माध्यमातून हलकाफुलका विनोद मांडला. तसेच प्रपंचात भांडण ही किती आवश्यक गोष्ट आहे, हेही कथन केले. हास्यकवी बंडा जोशी यांनी (मोबाईल)चं याड लागलं, ही कविता आपले सारे जगणे व्यापून टाकलेल्या यंत्राचे वास्तव मांडत उलगडत नेली.

ग. दि. माडगूळकरांचे 'एक धागा सुखाचा', या गाण्यावरील एक कपडा पतीचा, शंभर अर्धांगिनीचे, गतजन्मीचे देणे असते दुकानदारांचे...अशा शब्दांत नवरे लोकांची व्यथा मांडली. त्यांनी रिमझिम पाऊस पडे सारखा, या गीतावरील रिप रिप पाऊस पडे बारका तरि खड्डयांची रांग पुढे खड्डेच खड्डे चहूकडे गं बाई गेला रस्ता कुणीकडे, हे विदारक वास्तव सांगणारी कविता सादर करून टाळ्या मिळवल्या.